# आनंदी यात्री

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ........ काव्य
दा. क्र. २१५८



BVBK-0402158

ले. सौ. शांता परांजपे

२९५८
५।३।८८

# आनंदी यात्री

BVBK-0402158

लेखिका : सौ. शांता परांजपे

२९५८ ५।३।८८

**प्रथमावृत्ती १ जानेवारी १९८८**

प्रकाशक :

**गजानन धर्मा कोळी**
जयजलाराम अपार्टमेंट
ब्लॉक नं. २, फर्स्ट फ्लोअर
खारकर आळी, जुनी पोलीस लाईन
ठाणे.

※

सर्व हक्क लेखिकेचे स्वाधीन.

※

मुद्रक :
**पु. मो. पाटील**
व्यवस्थापक
मत्कार प्रिंटिंग प्रेस
टिळक रोड
मु. पो. ता. अलिबाग, जि. रायगड.

माझा नातू

चि. सुजय

यास

आशिर्वादपूर्वक

शांता आजीकडून

# अंतरंग


बाळपण

यमुना – गोपाळराव – विवाह

आनंदीबाईचा विद्याभ्यास

आनंदीबाई – कार्पेंटर मावशी

अमेरिकेस जाण्याचा बेत

अमेरिकेस प्रयाण व वास्तव्य,

अमेरिकन लोकांस आनंदीबाईंनी दिलेली मेजवानी,

आनंदीबाईची समतोलवृत्ती – एम्. डी. पदवी,

आनंदीबाई – मायदेशी परत,

डॉ. आनंदीबाई जोशी – मानसचित्र (ए मेंटल फोटोग्राफ)

प्रस्तावना ५।३।८८
२९२८

# प्रस्तावना

भारतीय नारीविश्वात डॉ. सौ. आनंदीबाई गोपाळराव जोशी हे एक अद्वितीय स्त्री रत्न चमकून गेले. इ. स. १८६५ हा त्यांचा जन्मकाळ रांधा वाढा, उंष्टीकाढा हे त्या काळच्या जमान्यात स्त्रीच्या कपाळी लिहिलेले होते. अज्ञानाधकारात बुडालेल्या स्त्री समाजापैकी निदान एका तरी स्त्रीला म्हणजेच स्वत:च्या बायकोला, उच्च शिक्षण देण्याच्या ध्येयाने पछाडलेल्या गोपाळराव जोशांशी आनदीबाईचा विवाह झाला. गोपाळराव पोष्टातील साधे कारकून आणि आनंदीबाई लहानपणी शाळेत जाण्याचे टाळून खेळांत रमणारी मुलगी, पण गोपाळरावांनी आनंदीच्या मागे अभ्यासाचा एवढा लकडा लावला कीं त्यामुळे तिच्या अंगच्या सुप्तग्रहणशक्तीने विद्येच्या क्षेत्रांत चमत्कार घडवून आणला. मराठी, हिंदी, इंग्रजी, बंगाली, गुजराथी, कानडी या भाषा त्यानी आत्मसात केल्या, अमेरिकेत तीन वर्षे राहून वैद्यकशास्त्रांतील एम. डी ही पदविका सन्मादनीय रीत्या प्राप्त करून घेतली या काळांत त्यानी हिंदूधर्म आणि हिंदी चालीरीतींचे कटाक्षाने पालन केले. एम. डी. झाल्यावर त्यावेळी अमेरिकेत गेलेले त्यांचे पती गोपाळराव याचा विचार आनंदीबाईसह अमेरिकेत सुखाने रहावे असा होता. पण आनंदीबाईना भारतात येऊन आपल्या ज्ञानाचा उपयोग भारतीयाचे दु:ख दैन्य नाहीसे करण्याचा प्रयत्न करण्याचा ध्यास लागल्याने त्या पतीसह भारतात आल्या. पण त्यांचे शरीर अनेक आजारांचे माहेरघर बनले असल्याने भारतीयाची सेवा त्या करू शकल्या नाहीत, त्याच्या आजाराचे मूळ कारण अमेरिकेत जाण्यासाठी बोटीत पाय ठेवल्यापासून तो परत भारतात येईपर्यंत त्याची आर्थिक दृष्टया झालेली हलाखीची स्थिती हेंच होते.

आनंदीबाईची विद्वत्ता, हुशारी पाहून त्यानी ख्रिस्ती धर्म स्वीकारावा त्यासाठी त्यांच्यावर बरीच दडपणे आणली गेली पण त्यांनी त्याला दाद दिली नाही. त्या ख्रिस्ती झाल्या असत्या तर पैशाची कमतरता पडली नसती, पण त्या मोहाला त्या बळी पडल्या नाहीत. हिंदूधर्म आणि संस्कृतीवर त्यांची अपार निष्ठा होती. हिंदुस्थानात आजारी पडून झाल्यावर औषधोपचार

सुरू झाले. त्यांना आयुर्वेदाचे उपचार करून घ्यावयाचे होते. म्हणून त्या पुण्यास वैद्य मेहेंदळे यांचेकडे गेल्या, पण त्यांनी आनंदीबाई गोऱ्या बायकांबरोबर राहून आल्यामुळें औषधोपचार करण्यास नकार दिला. सनातन धर्माच्या नावाखाली माणुसकीचा किती ऱ्हास होतो याचे हे उदाहरण लोकमान्य टिळकांनी आनंदीबाईना शंभर रुपये आपणाहून पाठविण्याचा उल्लेख पुस्तकात आहे. पुस्तकाचे शेवटी आनंदीबाईनी लिहिलेले एक प्रश्नोत्तरांचे टिपण दिले आहे. त्यावरून त्यांचा व्यासंग, चिंतन आणि स्वतंत्र विचारशक्ती याचा प्रत्यय येतो, आनंदीबाईना अवघे एकवीस वर्षे अकरा महिन्याचे आयुष्य लाभले, एवढ्या अल्पायुष्यांत त्यांनी मिळविलेले यश पाहून मन स्तिमित होते, स्त्री शिक्षण सामाजिक दुषण मानल्या जाणाऱ्या त्या काळात आनंदीबाईच्या कर्तृत्वाने गडद अंधारात वीज चमकून क्षणार्धात लख्ख प्रकाश पडला आणि स्त्री शिक्षणाला गति मिळाली अशा या असामान्य स्त्रीचे अति छोटे पण साधार चरित्र महत्वाच्या घटनासह प्रसिद्ध करून चरित्र लेखिका सौ. शांताबाई परांजपे यांनी समाजप्रबोधनाचे मोठे कार्य केले आहे. यापूर्वी त्यांनी पंडिता रमाबाई, भारताच्या माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरागांधी, सौ. अवंतिकाबाई गोखले, यांची चरित्रे लिहिली आहेत बुद्धीवान व कर्तृत्ववान स्त्रियांची चरित्रे लिहिण्याचा सौ. शांताबाईचा हा स्तुत्य उपक्रम असाच चालू राहील अशी अपेक्षा आहे.

– द. म. सुतार

# हृद्गत

शंभर वर्षापूर्वी आनंदीबाई जोशी नावाची एक स्त्री वैद्यकीय शिक्षणासाठी अमेरिकेला गेली. माजघराबाहेरही स्त्रियांनी येऊ नये, लिहा वाचायला शिकू नये अशी समाजधारणा असलेला तो काळ, एका विशिष्ट ध्यासाने प्रेरित होऊन केवळ पतिनिष्ठेच्या बळावर सभोवतालच्या समाजाचा प्रखर विरोध पत्करून अनेक हालअपेष्टांचा कणखरपणे सामना देणाऱ्या डॉ. आनंदीबाई जोशी यांना ध्येयपूर्तीचा क्षण जवळ आला असताना क्षयाने गाठले. भारतात उच्च वैद्यकीय शिक्षणाचे दरवाजे स्त्रियांसाठी खुले नाहीत म्हणून अमेरिकेसारख्या अनोळखी देशांत जाऊन त्यांनी जे दिव्य केले त्याला स्त्री शिक्षणाच्या इतिहासात तोड नाही. असेच म्हणावे लागते.

डॉ. आनंदीबाई जोशी या पहिल्या वहिल्या स्त्री डॉक्टरचे आयुष्य पाहिले म्हणजे तिच्या कर्तृत्वाचे महत्व पटते. अमेरिका देशांत जाणारी ही पहीली एतद्देशीय महिला. वैद्यकीय पदवी मिळवणारीही हीच सर्वप्रथम महिला होय. दुर्दैवाने महत्प्रयासाने मिळविलेले वैद्यकीय प्रशिक्षण समाजोपयोगी कार्यासाठी वापरण्याचा आतच डॉ. आनंदीबाईना मृत्यूने गाठले, आणि एका स्वप्नाचा ध्येयपूर्तीपूर्वीच अंत झाला. डॉ. आनंदीबाईच्या अकाली निधनाने अवघा महाराष्ट्र हळहळला होता.

अनोळखी देश, अनोळखी माणसे, अनुकूलता कसलीच नाही, तरी अशाही परिस्थितीत आनंदीबाईनी आपला, निश्चय, साहस व धैर्य टिकवून धरले, अमेरिकेत त्यांच्यावर अनेक संकटे आली, पण त्या निश्चयापासून ढळल्या नाहीत, कारण गोपाळरावांची कांही वेडीवाकडी, कुत्सित पत्रे आली तरी त्या डगमगल्या नाहीत, कारण त्याना गोपाळरावाचे त्यांचेवरील प्रेमाची कल्पना होती. मूर्तिमंत ख्रिस्ती राज्यांत ३ वर्षे राहूनही परधर्माचा स्वीकार न करता परदेशीयाची मने न दुखवता, आपल्या आचारांचे त्यानी संरक्षण केले, गेल्या शतकांत महाराष्ट्रामध्ये ज्या बुद्धिमान, विद्वान आणि कर्तबगार स्त्रिया होऊन गेल्या त्यामध्ये डॉ. आनंदीबाई जोशींचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. अर्वाचीत काळातल्या महाराष्ट्रातील एक थोर विदुषी या भावनेनेच मी त्यांचे चरित्र लिहिले आहे.

प्रस्तुत चरित्र लिहितांना मी आनंदीबाईच्या विषयी वृत्तपत्रांतून निरनिराळ्या लेखकांनी लिहिलेल्या छोटया–मोठया ग्रंथाच्या ,आधाराने हा डॉ. आनंदीबाईचा छोटासा जीवनपट (चरित्र) लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

माझ्या छोटया–मोठया विद्यार्थी वर्गाला हे पुस्तक वाचावेसे वाटेले या दृष्टीकोनांतून लिहिले आहे.

ज्येष्ठ पत्रकार व स्वातंत्र्यसैनिक श्री. द. म. मुतार यानी माझी पहिली दोन पुस्तके वाचून काही वहुमोल सुचना केल्या होत्या. त्यांचेकडून माझ्या लेखनास वारंवार आपुलकीने साहाय्य मिळत आले आहे. यावेळी मी श्री. द. म. सुतारांना त्यांनी डॉ. आनंदीबाई जोशी (आनंदी–यात्री) यांच्या चरित्राला प्रस्तावना लिहावी. अशी नम्र विनंती केली. त्यांनी ती मान्य केली. या पुस्तकाला त्यांची प्रस्तावना लाभली हे माझे मोठे भाग्य ! त्यांचे आशिर्वाद असेच नेहमी लाभावेत ही इच्छा. ह्या पुस्तकाचे मुखपृष्ठ माझे विद्यार्थी, विख्यात चित्रकार श्री. शांताराम राऊत यांनी अत्यंत तत्परतेने व आत्मियतेने अल्पवेळांत करून दिले. श्री. शांताराम राऊत यांना आतापावेतो चार वेळा united Nations poster and eniblem Competitiong मध्ये पारितोषिक मिळाले आहे. ते एका विख्यात जाहिरात संस्थेत Art consultant म्हणून काम करतात. तसेच स्वस्तिक स्वरूप गणेशाची मूळ कल्पना श्री. राऊत यांचीच तर इतक्या असंख्य उद्योगांतून त्यांनी वेळांत वेळ काढून मुखपृष्ठाचे काम पूर्ण करून दिले. त्याचे आभार कसे मानावे हे कळतच नाही. महाराष्ट्र टाईम्सचे श्री. अरुण टिकेकर यांनी डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या छायाचित्राबाबत योग्य मार्गदर्शन केले. ही छायाचित्रे आपणास डॉ. सरोजिनीबाई वैद्यांकडे उपलब्ध होतील असे कळविले. त्याप्रमाणे मी लगेच डॉ. सरोजिनीबाईशी फोन करून संपर्क साधला. त्यांच्याहि मागे अनेक कामे असताना त्यांनी वेळात वेळ काढून डॉ. आनंदीबाई जोशी यांची दोन दुर्मिळ अशी छायाचित्रे उपलब्ध करून दिली श्री. अरूण टिकेकर व डॉ. सरोजिनीबाई वैद्य, या दोघांचे छायाचित्र छपाईला मिळवून दिल्याबद्दल मन.पूर्वक आभार. शेवटी थोडया अवधीत सुबक छपाई करून हे चरित्र रसिकापर्यंत पोहजविण्याचे श्रेय, अलिबागचे सत्कार प्रिंटिंग प्रेसचे व्यवस्थापक श्री. पुरुषोत्तम गोविंद पाटील यांनाच आहे. त्यांचे मनःपूर्वक आभार. अलिबागचे पत्रकार श्री. अमर वार्डे यांनी

प्रूफ तपासण्याचे मोठे जबाबदारीचे काम अंगावर घेऊन माझे एक मोठेच काम हलके केले. याबद्दल त्यांचेही मन:पूर्वक आभार.

डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र (आनंदी–यात्री) मी कमीत कमी पृष्ठात व जास्तीत जास्त माहिती देऊन लिहिले आहे. ते कसे उतरले आहे. ते ठरविण्याचे काम वाचकांचे आहे.

माझे विद्यार्थी (मित्र) रा. गजानन धर्मा कोळी यांनी त्यांचा सुपुत्र कै. धर्मेश गजानन कोळी यांचे स्मृतीप्रित्यर्थ देणगी देऊन प्रकाशनाची सारी जबाबदारी अंगावर घेतली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते, त्यांचा पुत्र फारच लहान वयात म्हणजे १५ व्या वर्षीच ब्लड कॅन्सरने निधन पावला, त्याच्या आत्म्यास चिरशांती लाभो, ही ईशचरणी प्रार्थना,

**सौ. शांता परांजपे**

# प्रमुख संदर्भ साहित्य


१) डॉ. सौ. आनंदीबाई जोशी, चरित्र सौ. काशिबाई कानिटकर
सप्टेंबर १९१२

२) आनंदी गोपाळ कादंबरी श्री. ज. जोशी (१९६८)

३) आनंदी गोपाळ नाटक राम जोगळेकर (१९७६)

४) डॉ. आनंदीबाई जोशी (लोकसत्ता कात्रण) मधुसूदन फाटक

५) आनंदाचा झरा, डॉ. आनंदीबाई जोशी (महाराष्ट्र टाईम्स कात्रण)
अरुण टिकेकर

६) आनंद यात्री, डॉ. आनंदीबाई जोशी (तरुण भारत कात्रण)
प्रा. सु. वा. ओडेयर (गारगोटी)

७) आनंद ज्योती, आनंदीबाई जोशी– भालचंद्र गुजर

लेखिका :– **सौ. शांता परांजपे**

# आनंदी यात्री —

## डॉ. आनंदीबाई जोशी

### १ बाळपण

पुणे येथे ३१ मार्च १८६५ काळेबावरांत पिंपळाजवळ बाळशास्त्री माटे यांच्या घरी यमुनेचा जन्म झाला. यमुनाबाईची आई ती बाळशास्त्री माटयांच्या बहीणीची मुलगी. ह्या बाई आपल्या आजोळी बाळंतपणासाठी आल्या होत्या. रा. गणपतराव अमृतेश्वर जोशी हे यमुनाबाईंचे वडील. कल्याणच्या जवळ त्यांच्या एका पूर्वजाला काही गाव इनाम मिळाले होते. त्या इनामापैकी काही भाग गणपतरावांच्या वाटयास आले होते. हे गृहस्थ धर्म-निष्ठ, जुन्या चालीचे, शांत, सभ्य, मनमिळाऊ होते. त्यांना पहिल्या पत्नीपासून एकच पुत्र होता. नंतर त्यांनी दुसरे लग्न केले. दुसऱ्या पत्नीस एक मुलगा व तीन कन्या, अशी अपत्ये झाली, त्या तीन मुलीपैकी यमुनाबाई मधल्या होत, बाराव्या दिवशी मुलीचे नाव ‘ यमुना ’ असे ठेवले. यमुनाबाईच्या आईचे नाव गंगाबाई. गंगाबाई सुदृढ होत्या, धार्मिक होत्या, यमुना तीन महिन्याची झाल्यावर गंगाबाई कल्याणला आपल्या घरी आल्या.

यमुना दिवसमास वाढू लागली. ती दोन तीन वर्षाची असतांना फारच गोजीरवाणी दिसे. तिचा वर्ण साधारण गोरा, गाल लाल होते. केस काळेभोर असून कुरळे होते, एकंदरीत पोर मोठी गोड दिसे. ती नेहमी स्वच्छ असे, खेळकरही होती. त्यामुळे ती सर्वांनाच फार आवडे यमुनेला ५ व्या वर्षी खूप देवी आल्या.

देवीच्या दुखण्यांतून ती नशीबानेच वाचली देवीमुळे अंगावर व्रण राहिले. कानाला झालेल्या अपायाचे दुःख जन्मभर भोगावे लागले तिचे गोरेपण कमी होऊन काळेपणाची झाक मारू लागली. ६, ७ वर्षाची असतांना ती आपल्या मैत्रिणी जमवून झोपाळ्यावर बसून ओव्या म्हणणे. खेळांतली छोटी घरे बांधणे, देव मांडून उत्सव करणे परसांत बाग करणे त्या बागेत भाज्या, फुलांची झाडे लावी तिच्या स्वभावाला एक मिनिटभरसुद्धां स्वस्थ बसणे आवडत नसे. तिला बागकाम फार आवडे, ती झाडे लावी, ती गुरे खात किंवा तुडवीत तेव्हां ही गुराख्याला रागे भरे, आणि पुन्हा उत्साहाने झाडे लावी तिचे वडील म्हणत "काय बेटी दीर्घोद्योगी आहे पहा! पुन्हा पुन्हा तेच ते काम कितीदा करते आहे, पण त्याचा तिला कंटाळा नाही." यमुनेच्या आजीचा तिच्यावर फार लोभ होता ती आजीची फार लाडकी होती. यमुनेच्या आईने तिला मारलेले आजीला अजिबात खपत नसे, आजी म्हणत "लहान मुले वस्तुंचा परिचय करून घेत असतात, हे सृष्टीचे शिकविणे आहे" यमुनेची धारणा-शक्ती विलक्षण होती, तिने एखादी गोष्ट जरी ओझरती ऐकली असली तरी ती तिच्या ध्यानांत रहात असे यमुनेला तिच्या आई-वडिलांनी शाळेत घातले ते विद्याप्राप्तीच्या हेतुने नव्हे, तर ती फार घरांत फार दांडगाई करते, तर ती शाळेंत अडकून राहील, गुतून राहील. यमुना शाळेत जातांना अतिशय खळखळ करी. कधी म्हणे 'माझे पोट दुखते' म्हणून बहाणा करी, पोट दुखते म्हणून गडबडा लोळू लागे, मग आजी म्हणे 'बाळ, यमू तू नकोहो शाळेत जाऊ! सर्व खोटेच असल्यामुळे यमू पुन्हा दांडगाई करण्यास मोकळी! यमुनेचा दांडगा स्वभाव पाहून आई म्हणे ही किनई मोठेपणी साऱ्यांच्या डोक्यावर मीरे वाटील, शेजारपाजारचे म्हणत "जोशांच्या मुलीचे लक्षण काही ठीक दिसत नाही, काय अफाट मुलगी आहे" आजी म्हणत "यमू बुद्धिमती होईल. ही आता फार

हुड व दांडगी आहे पण पुढे निवळेल यमू मोठेपणी निश्चयी बायको होईल" आई आजीला म्हणे "पुरे लेकीचे कौतुक! कौतुक करता करता डोकीवर बसवून ठेवले आहे!" यमुना जुलमाने शाळेत जात असे, अक्षरओळख बरीच झाली होती. तात्यासाहेबांना त्याचे मोठे कौतुक वाटे, त्यांचे स्नेही त्यांचेकडे आले कीं तिच्या तिक्ष्ण बुद्धीची तारीफ करून कधी यमुनेला पुस्तक वाचावयास सांगत आलेले स्नेही जुन्या मताचे असत. घरी गेल्यावर टीका करीत, आणि म्हणत, तात्या जोशी अगदी विक्षिप्त होत चालले आहेत, मुलीला मंडळीत आणून वाचावयास सांगतात मुलगी पण धीट आहे.

यमुनेला शाळेत जाण्याचा फार कंटाळा, एक दिवस यमू सकाळी वेणी, अंगधुणे करून जेवली, जेवून शाळेंत जाते सांगून एका मैत्रिणीकडे खेळत बसली. १० वाजता शाळा सुटली, तरी यमुना घरी आली नाही. गड्याने सांगितले "यमुनाबाई शेजारी खेळत आहे." यमुनेची आई तुळशीला पाणी घालीत होती, ती तशीच सोवळ्याने वाघिणीसारखी चवताळून त्या शेजारच्या घराकडे धावली. यमुना अंगणातच खेळत होती तिला आईने तेथून लाथा मारीतच घरी आणले. आई यमुनेला इतकी मारी पण यमुना अतिशय शांत स्वभावाची असल्यामुळें सगळे मुकाट्याने सहन करी, पण आपला हेका काही सोडत नसे.

यमुनेला ७ वे वर्ष लागले. तेव्हां वडिलांना लग्नाची काळजी लागली. यमुना ७ वर्षाची असली तरी उफाड्याची असल्यामुळें ९, १० वर्षाची वाटे, तिचा बांधा तिच्या आईप्रमाणे सुदृढ होता. व तिची आजी तिच्या खाण्यापिण्याकडे लक्ष देई, तिला चांगले चुंगले खायला देई त्यामुळे यमुना केळीच्या कोंबा-प्रमाणे ताजी दिसे, तिला आठवा मंगळही होता, तिला लहानपणी

देवी आल्यामुळे कान जरासे अधु झाले होते व तोंडावर व्रण राहि-ल्यामुळे रंग जरा सावळा दिसे. यमुनेला स्थळ कसे मिळेल याची काळजी वडिलांना रात्रंदिवस होती. हुंडा देण्याचे सामर्थ्य नव्हते द्रव्याच्या अडचणीमुळे तिला प्रथम 'वर' मिळण्याचा संभव कमीच होता. तसेच ती वयाने होती त्यापेक्षा मोठी दिसे, ऋतुप्राप्तीपूर्वी मुलीचे लग्न झाले नाही तर आई वडिलांना पाप लागते या संके-ताने १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातही महाराष्ट्रीय बालविवाहाच्या प्रथेशी समाज जखडला गेला होता.

• • •

## २ यमुना–गोपाळराव विवाह

यमुना उपवर झाली. वडिलांनी पुष्कळ ठिकाणे पाहिली. पण तिचे कोठे जमेना. वडील कंटाळले व म्हणू लागले "आता कोणीतरी विद्यार्थी पाहून, मुलगी पिवळी करून त्याचे पदरी बांधितो! नाहीतर एकाद्या बिजवराला दुधभात घालून त्याच्या स्वाधीन करतो, यमुनेला नवरा मिळत नाही म्हणून तिच्या आईने यमूस रोज सांबाच्या देवळात प्रदक्षिणा घाल म्हणून सांगितले, ज्या दिवशी तिने देवास जाण्यास आरंभ केला. त्याच दिवशी दुपारी २ वाजता बातमी आली "कल्याणच्या पोष्टऑफीसात वर आला आहे पहाण्यास चला" ते ऐकल्यावर यमुनेची बहीण, मावशी व आजी अशा मिळून पोष्ट ऑफीसात मागल्या दाराने गोपाळरावांना पहाण्यास गेल्या. स्वारीचे बारीक बोलणे, लहान शेंडी पागोटयाची चुंबळ व टाचेपर्यंत आलेले धोतराचे सोगे पाहून त्यांना जावई आवडला. नंतर यमुनेला शेजारी कानिटकरांचे घरी नेऊन दाखविली.

गोपाळरावांनी मुलीला पहातांना इतर चालीप्रमाणे बोलण्याचालण्याची चवकशी न करता नुसती अवलोकन करून 'बरी आहे' असे म्हटले व साखरपुडयाचा विधी करून तिथी निश्चितही केली. गोपाळ विनायक जोशी हे मूळचे संगमनेरचे! ते टपालखात्यात नोकरीस होते. प्रतिकूल परिस्थितीमुळें त्यांचे शिक्षण जरी फारसे झाले नव्हते, तरी त्यांचे विचार हे सुधारकी आणि एकुणच तेव्हाच्या समाजाला न पटणारे होते. स्वतःच्या पत्नीला शिक्षण देऊन तिला शहाणी करावी हा त्यांचा विचार होता. स्त्री शिक्षणाबद्दलची एकूणच अनावस्था पाहून त्यांना राग येई ते म्हणत "हे लोक हाताने काहीच करीत नाहीत. तोंडाने मात्र बडबड चालू असते ह्यापैकी एकही जण एखादी स्त्री शहाणी करूण जगास

दाखवीत नाही. माझ्या जवळ जर अशी कोणती स्त्री शिकावयास तयार झाली. तर मी तिला उत्तम शिक्षण देईन. आपल्या देशाची गणना सुधारलेल्या देशात होण्यासाठी स्त्री शिक्षण आवश्यक आहे. स्त्री शिक्षण हे कुटुंब सौख्याचे मूळ आहे. प्रत्येक सुधारणेस आरंभ व्हायचा तो आपल्या घरापासूनच झाला पाहिजे. म्हणून त्यांनी आपल्या बायकोला पूर्ण शिक्षण देण्याचे ठरविले. तिला शिक्षण मिळाले म्हणजे ती आपल्या देशभगिनीस विद्यादान करील."

बोलल्याप्रमाणे कृती करणे हा गोपाळरावांचा स्वभावधर्मच असल्याने त्यांनी आपल्या पहिल्या पत्नीला शिक्षण देण्यास सुरवात केली. त्यांचे पहिले लग्न झाले. तेव्हां त्यांची बायको अवघी ६ वर्षाची होती. पहिल्या पत्नीला शहाणी करण्याचा त्यांचा प्रयत्न दुर्दैवाने अपुरा राहिला. त्यांची पहिली पत्नी निवर्तली. त्यांना एक पुत्र झाला त्याचे नाव कृष्णा आपल्या सुधारकीवृत्तीला अनुसरून त्यांनी एकाद्या विधवा स्त्री बरोबर विवाह करावा असा बेत केला पण त्यांची टपालखात्यांतील सामान्य नोकरी व इतर कारणांमुळे त्यांचा हा बेत सिद्धीस गेला नाही. नातेवाईकांच्या मध्यस्थीमुळे त्याचा विवाह आनंदीबाईशी ठरला. तिथि ठरण्यापूर्वी गोपाळरावांनी सांगितले "मी हिला मला आवडेल त्याप्रमाणे शिक्षण देईन. याबद्दल तुम्ही मागाहून कुरकुर कराल तर मला आवडणार नाही." वडिलांनी ती अट मान्य केली पहिला मुहूर्त चुकला. गोपाळरावांना सांगितले. ,आमची चुक झाली माफ करा' शेवटी ३१ मार्च १८७४ ला ९ वर्षाच्या यमुनेशी गोपाळरावांची विवाह गाठ बांधली गेली, यमुताईचे नाव गोपाळरावांनी आपणास ही तरी आनंद देवो म्हणून आनंदी असे ठेवले.

यमुनेचा विवाह सर्वार्थाने वेगळा होता, लग्नाची धामधुम रुसणी फुगणी, जेवणावळी, देणीघेणी या सर्वांना गोपाळरावांनी

फाटा द्यायला लावला होता. लग्नाच्या याद्या न होताच लग्न होणार याचे लोकांना आश्चर्य वाटत होते. एवढेच नव्हे तर लग्न झाल्यावर मुलीला शिकविण्याचा गोपाळरावांची अट ऐकून ते विक्षिप्त आहेत असे वाटू लागले. यमुनेचे लग्नानंतर कसे होणार याची विवंचना घरच्या लोकांना लागली. लग्न झाल्यावर गोपाळ-राव कल्याणासच सासुरवाडीस राहू लागले. जवळजवळ ८ महिने ते तेथे होते. माहेरी कल्याणास राहून यमुनेचे शिक्षण होणार नाही, म्हणून त्यांनी आपली बदली अलिबागेस करून घेतली एक दिवस गोपाळरावांनी यमुनेजवळ पाटी व पुस्तक देऊन सांगितले कीं 'हा एवढा धडा पाठ कर' तेव्हां यमुनेने ती पाटी व ते पुस्तक फेकून देऊन 'मला नाही शिकायचे,' मला शिकून कोठे चाकरी करावयाची आहे. व तेथून ती उठून गेली. तेव्हां गोपाळरावांनी तिला शिकण्यापासून कोणते फायदे होतात ते समजावून दिले. कधी, कधी ते तिला फिरावयास नेत, कधी नवे बूट आणत, व म्हणत आता अभ्यास करणार ना? अशा तऱ्हेने त्यांनी आनंदीबाईचे मन विद्येकडे वळविले. आनंदीबाई जात्याच बुद्धीमान होती दिलेला धडा ताबडतोब करी पोरस्वभावाप्रमाणे व लहान वयामुळे तिला खेळण्याची इच्छा होई. पण आजी सांगे 'आधी धडा कर, व मग खेळ, तेव्हां तिला आजीचा राग येई आळोखेपिळोखे देत अभ्यास होई. मनसोक्त फुगड्या, झिम्मा छप्पापाणी खेळतांना आनंदीचे अंग चांगलेच लवे. आनंदीबाईला नटण्याची फार आवड होती, चोळ्या सईल व लांब आवडत नसत. वेणीचा एक केसही विसकटलेला आवडत नसे, कुंकू फार मोठे आवडत नसे, लुगडी मोठमोठ्या काठांची उंची असत, नेसण व्यवस्थित असे. दागिन्यांची आवड होती, आनंदीबाईचा विद्याव्यासंग वाढल्यावर, तिची नटण्याची आवड कमी झाली गोपाळरावांना साधेपणा आवडे तर आनंदीबाईला छानछोकी

दोघांचे मत जमत नसे. 'कुंकू लहान चांगले दिसते' असे आनंदीबाई म्हणत, त्यावर गोपाळराव त्यांना कुजक्या शब्दांनी बोलत.

आनंदीबाईचे लग्न झाल्यानंतर, दोन वर्षाच्या आंतच त्यांचा मराठी अभ्यास जुलमाने, खुषीने, धाकाने पार पडला. भूगोल व्याकरण, मराठी, इतिहास, गणित यांचाही अभ्यास त्यांनी केला मराठी अक्षरही सुधारले, दोन वर्षाच्या आंतच आनंदीबाईना दिवस गेले, बाळंतपणास त्या कल्याणला गेल्या. त्यांना मुलगा झाला. त्यांच्या मुलाने जगांत १० दिवसच वास्तव्य केले. मूल गेल्यावर आनंदीबाईना फार वाईट वाटले व काही दिवस अभ्यासही करवला नाही, बाळंतपणाचे ३ महिने झाल्यावर त्या कल्याणहून पुन्हा अलिबागेस आल्या. अलिबागेस गोपाळराव त्यांना कधीकधी समुद्रावर ताजी हवा खाण्यास घेऊन जात, काही कुटाळ लोक त्यांना त्रास देत कुचेष्ठा करित गोपाळरावांचा स्वभाव निश्चयी ते त्या लोकांकडे लक्ष देत नसत. आता आनंदीबाई इंग्रजी शिकू लागल्या, त्यांची ग्रहणशक्ति फार तीव्र होती, त्यामुळे धडे भराभर होत. त्या वर्तमान पत्रे, मासिके, पुस्तके पुष्कळ वाचीत. अलिबागला लोकांनी त्यांना फार त्रास दिला म्हणून गोपाळरावांनी कोल्हापूरला बदली करून घेतली. तेथेही तोच प्रकार आनंदीबाईस मायसीबाई, एक पाश्चात्य स्त्री शिकवीत असे पण कोल्हापूरच्या कारभारी मंडळाने ते जुन्या मताचे असल्यामुळें मायसीबाईना आनंदीबाईना शिकविण्यास प्रतिबंध केला, त्यामुळें गोपाळराव वेळांत वेळ काढून आनंदीबाईना घरीच शिकवू लागले माध्यमिक शिक्षणापर्यंत आनंदीबाईनी सहज मजल मारल्यावर गोपाळरावांचा उत्साह वाढला, आणि ते बायकोला उच्च शिक्षणासाठी परदेशांत पाठविण्याची स्वप्ने रंगवू लागले, भारतात त्याकाळी मोठ्या संस्थेने आलेल्या अमेरिकन मिशन ज्याकरवीच

हे साध्य होईल हे ओळखून मोठी मिशनरी शाळा असलेल्या कोल्हापुरला ते स्थिरावले. समाजाची अवहेलना सहन करून आनदी एका गोड्या मिशनरीकडे इंग्रजी शिक्षण घेऊ लागली.

तुझं इंग्रजी थोडच झालं आहे. आता संस्कृत बंद. आता तू 'हार्वड'चं पुस्तक आहे. आता ते वाचायचं. त्यांनी पुस्तकाचे पहिले पान उघडले व म्हणाले 'इंग्रजी वाचून तुला कळायचं नाही. पहिल्या धड्यांत इग्रजी का शिकावं हे सांगितलं आहे बघ. मी वाचून दाखवतो हं!' गोपाळरावांनी तिच्याकडे एकदा नीट आपादमस्तक बघितले आणि वाचण्यास सुरुवात केली.

English is the languge of the rulers of this country–Anyone who wishes to gain a Knowledge of Science or History, cannot learn more than the rudiments of the knowledge through an Indian Language, If any one desires to know the news, From day to day of his own and foreign countries, He will find it impossible if he cannot understand English Language

ते धडाधडा इंग्रजी वाचत होते. आनंदी चकित होऊन वेड्या-सारखी त्यांच्याकडे बघत होती. मग एकदम त्यांच्या लक्षात आले. ते हसून म्हणाले, 'मी वाचतोय अन तू ऐकते आहेस तुला काय कळणार? थांब, तुला वाक्यावाक्याचा अर्थ समजवून सांगतो ते अर्थ सांगत गेले, आनंदी भारल्यासारखी बघत होती.

## ३ आनंदीबाईचा विद्याभ्यास

गोपाळरावांना व आनंदीबाईना कोल्हापूरलाही फार त्रास झाल्यामुळे त्यांनी आपली बदली मुंबईला गिरगाव पोस्ट ऑफीस-मध्ये करून घेतली. गिरगावांत प्रार्थना समाज मंदिरात ख्रिस्ती धर्म प्रसारक मंडळीची शाळा होती. तेथ शाळेंत जात असतांना आनंदीबाई बूट घालून जात, त्यावेळी लोकांनी त्यांची निंदा करावी, पाहून हंसावे एवढेच करून ते थांबत नसत तर आनंदीबाईच्यावर खडेही फेकत, तरी त्या डगमगल्या नाहीत. हे सर्व ऐकून गोपाळरावांचे वडील त्यांस म्हणाले, ‘ बायकांच्या जातीला स्वतंत्रता व विद्या ही काय कामाची ? बाप–लेकांचे भांडण झाले. आनंदीबाईंचा शाळेत (एस. पी जी.) नेहमी वरचा नंबर असे. गोपाळरावांना अमेरिकेत जायचे वेड लागले. आपल्या पत्नीने देशभगिनींच्या उपयोगी पडावे यासाठी वैद्यकीय किंवा शिक्षिकेचा व्यवसाय पत्करावा अशी त्यांची इच्छा होती. ज्या प्रकारचे आणि ज्या वातावरणात शिक्षण मिळावयास हवे ते वातावरण व शिक्षण हिंदुस्थानांत नव्हते. म्हणून त्यांनी आनंदीबाईना अमेरिकेला पाठविण्याचे ठरविले. गोपाळराव पोस्टांतील साधे कारकून, द्रव्यबळ त्यांचेजवळ नव्हते. पण निश्चयाचे बळ जबरदस्त होते म्हणून नाऊमेद न होता आनंदीबाईना अमेरिकेत जाण्याची संधी मिळावी म्हणून त्यांनी खूप प्रयत्न केले. रेव्हरंड गोहिन यांच्याशी गोपाळरावांनी स्नेहसंबंध प्रस्थापित केले. आणि अमेरिकेतील त्यांच्या मिशनरी बंधुशी पत्रव्यवहार सुरु केला.

## गोपाळरावांच्या पहिल्या पत्राचा आशय :-

(अमेरिकेस पाठविलेले पत्र)

स्त्री शिक्षण हा विषय मला फार आवडतो. आमच्या देशांत शिक्षणाच्या मार्गात अनेक अडचणी येतात. माझ्या पत्नीचे शिक्षण परिपूर्ण होण्याच्या हेतूने मला तिला अमेरिकेत घेऊन यावेसे वाटते. माझ्या बायकोचे वय १४ वर्षाचे आहे. शिक्षणास हे वय योग्य आहे. तिला मोडी व बालबोध दोन्ही येते, इंग्रजी तिसरे पुस्तक ती वाचते व मराठी दुसऱ्या पुस्तकाचे इंग्रजी भाषांतर करते, आपल्या देश भगिनींच्या पुष्कळसे उपयोगी पडेल म्हणून तिने अमेरिकेत येऊन वैद्यकीचा अभ्यास करावा असे मला वाटते.

रेव्हरंड गोहिन यांचे चिरंजीव त्यावेळेस भारतात अमेरीकेचे राजदूत म्हणून आले होते. या माणसाला त्याच्या बायकोसकट आपल्या कळपात आणता येईल या आशेने, मिशनऱ्यांनी गोपाळ-रावांचे दि. ४-९-१८७८ रोजी त्यांच्या पत्नीला उच्च शिक्षण देण्याचा विचार व्यक्त करणारे पहिले पत्र अमेरिकेला धाडले, पुढील सर्व पत्रव्यवहार १६ वर्षांच्या आनंदीलाच त्यांनी करायला लावला, कारण एव्हाना तिचे इंग्रजीलेखन खूपच प्रगत झाले होते. गोपाळराव ख्रिस्ती धर्म स्वीकारत नाहीत असे लक्षात आल्यावर हा पत्रव्यवहार खरा म्हणजे केराच्या टोपलीत जाणार होता. पण जोशी दांपत्याचे नशीब थोर म्हणून न्यूजर्सी राज्यांतील रोशेत या गावी स्थायीक झालेल्या कार्पेंटर या कुटुंबातील स्त्रीने त्याची दखल घेतली, ती अपघातानेच. मिसेस कार्पेंटर एका दंत वैद्याकडे बसल्या असता, तेथील 'ख्रिश्चन ट्रिब्यून' या वृत्तपत्रांत छापून आलेला हा पत्रव्यवहार त्यांनी वाचला आणि या 'धाडसी भारतीय' जोडप्याशी पत्रमैत्री जोडण्याचे त्यांनी ठरविले.

'पत्रमैत्रीची' महाराष्ट्रांतील बहुधा आनंदीबाई ही पहिलीच संस्थापक असेल, दि. ७–३–१८८० ला मिसेस कार्पेंटर यांचे पहिले पत्र आनंदीबाईना मुंबईतच मिळाले.

**मिसेस कार्पेंटरबाईंच्या पत्राचा आशय पुढीलप्रमाणे :–**

प्रियभगिनी.

मला तू खरोखर, बहिणीसारखी वाटतेस म्हणूनच मी तुला 'प्रियभगिनी' असे म्हटले आहे. तू शिक्षणाकरिता किती उत्सुक व उत्कंठीत आहेस आपल्या देशांतील स्त्रियांहून आपली उन्नत स्थिती असावी, आपल्या स्वजातीस उन्नत करावे, व कल्याण करावे असे तुला वाटते. माझा जीव तुझ्याकडे ओढतो मी तुला निश्चितच मदत करीन.

हे पत्र मिळाल्यानंतर गोपाळरावांना ज्ञानाची प्रचंड गुहा सापडल्याचा आनंद झाला. नुकतेच ते गिरगाव पोष्टामध्ये पोष्ट-मास्तर म्हणून बदली होऊन आले होते. आपल्या टपाल खात्यांतील अनुभवाचा आणि अधिकाराचा फायदाही ते या पत्रव्यवहारासाठी घेत होते. 'मुंबईला आनंदीबाई एस. पी. जी. या मिशन स्कूलमध्ये जात. त्या शाळेतील प्रथेप्रमाणे, प्रामुख्याने मध्यमवर्गीयांची वस्ती असलेल्या गिरगावच्या रस्त्यावरून जेव्हा ही गोरीगोमटी ब्राह्मण बाई बूट, स्टॉकींगज् घालून जाई तेव्हा खिडक्याखिडक्यातून ही विचित्र 'यात्रा' पाहण्यास लोक उभे राहत. रस्त्यावर उभी असणारी पुरुष मंडळी अद्वातद्वा बोलून त्यांची टिंगल उडवीत. परंतु संबंध 'आयुष्याची यात्राच' वेगळ्या तऱ्हेने काढलेल्या निग्रही आनंदीला याची पर्वा नव्हती, मिसेस कार्पेंटर याना अमेरिकेला पहिले उत्तर मात्र आनंदीबाईनी स्वतंत्रपणे स्वतःच्या हस्ताक्षरात दि- १३–८–१८८० रोजी भूज

येथून पाठविले, कोठेही एका ठिकाणी स्थिर न राहण्याच्या स्वभावानुसार गोपाळरावांनी आपली बदली भूजला करून घेतली होती. भूजला असताना आनंदीबाईंनी मिसेस कार्पेंटरबाईंना एक संक्रातीच्या सणाला एक नथ व चांदीच्या पेटीत हलवा पाठविला.

भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरून ते जोडपं गेलं ते एकदम पूर्व टोकाला, कलकत्याला, भारताच्या सात, आठ, ठिकाणच्या या सतत बदलत्या वास्तव्यामुळे आनंदीबाईंचा दृष्टीकोन ह्या लहान वयातच विशाल झाला होता. तसेच आजूबाजूच्या समाजाशी घनिष्ठ संबध जुळण्याच्या आतच स्थानांतर होत असल्यामुळेच गोपाळरावांनी आणलेली शेकडो पुस्तके म्हणजेच त्यांच्या मैत्रिणी झाल्या होत्या.

## ४ आनंदीबाई–कार्पेंटर मावशी

कलकत्याहून कार्पेंटर बाईशी नियमित पत्रव्यवहार जोरात चालू झाला. दोघी एकमेकीना आपल्या चालीरीतीची माहिती लिहीत. अमेरिका आणि भारत या दोन टोकांच्या देशांतील या दोन बायका एकमेकींच्या खूप जवळ आल्या होत्या. ६ जून १८८१ रोजी लिहिलेल्या पत्रांत आनंदीबाईंनी मिसेस कार्पेंटरना ‘ मावशी ’ म्हणून संबोधिले, त्याचा त्यांना इतका आनंद झाला की, आपल्या या अनामिक भाचीला भेटण्यास त्या किती उत्सुक आहेत त्याचे वर्णन त्यानी आपल्या उत्तरांत केले आहे. अमेरिकेत वैद्यकिय शिक्षण घेण्याचे एव्हाना निश्चित झाले होतेच त्याचे सुतोवाचहि त्यांनी कार्पेंटर मावशीकडे केले होते. ‘ अमेरिकेस आलीस तर तुझे पालकत्व मी स्वीकारले आहे. असे अश्वासन

मिसेस कार्पेंटरनी पाठविले होते. या वृद्धीगत स्नेहाचे प्रतीक म्हणून आनंदीबाईंनी १० जानेवारी १८८२ रोजी लिहिलेल्या पत्रासोबत अमेरिकेत तिळगूळ पाठविला होता.

आनंदीबाई–मिसेस कार्पेंटर पत्रव्यवहार म्हणजे हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या स्थितीबद्दल, चालिरीतीबद्दल कुतूहल बाळगणारी अमेरिकन महिला, आणि तिच्या अनेक प्रश्नांना विस्तृत, मुद्देसूद व विचारपूर्वक उत्तरे देणारी हिंदुस्थानांतील महिला यांचे संभाषण, ही पत्रे वाचून आनंदीबाईंचा अभ्यास किती शास्त्रशुद्ध होता याचे प्रत्यंतर येते. ' मौंजीबधना ' संबधीच्या मिसेस कार्पेंटर यांच्या पृच्छेस आनंदीबाईंनी उत्तर देताना सोळा संस्काराची विस्तृत माहितीं दिली आहे. (पत्र १७ जून १८८१) एका पत्रांतून (१८ एप्रिल १८८२) विडा म्हणजे काय ? तो कधी खातात, हे आनंदीबाई लिहितात, तर दुसऱ्या एका पत्रांतून तीळगूळ पाठवितांना तिळाचे पांढरे, तांबडे, काळे असे तीन प्रकार व त्यापासून हलवा बनविण्याची कृती आदिचे वर्णन आहे. (१६ मे १८८२), अनेक पत्रांतून एतद्देशीय स्त्रीसंबंधी भाष्य आहे. तिची दिनचर्या, तिचे घरांतील, समाजातील स्थान, हिंदु सण, समारंभ यांचो माहिती मिळते. अगदी शेणाने घर कसे व का सारवले जाते. यासबंधीही आनंदीबाईंनी मिसेस कार्पेंटर यांना लिहिले आहे. दोघींच्या स्नेहसंबंधीची सुरवात पत्ररुपाने झाली. ही सारी पत्रे कार्पेंटर बाईंना मजेशीर व महत्वाची वाटली असणार म्हणून ती त्यांनी दतकथा आत्मीयतेने जपून ठेवली. या पत्रमैत्रीमुळे स्नेहाचे रुपांतर जणू नात्यांत झाले. आणि आनदीबाई मिसेस कार्पेंटरना ' मावशी ' असे संबोधू लागली.

बदलीच्या नोकरीमुळे गोपाळरावाचे विविध ठिकाणी

वास्तव्य झाले. त्यामुळे विविध भाषा जोशी दांपत्यास शिकावयास मिळाल्या. आनंदीबाईनी अमेरिकेला पाठविलेल्या अर्जात आपल्याला मातृभाषा मराठीबरोबर संस्कृत, बंगाली, गुजराती कन्नड, हिंदी व इंग्रजी भाषा अवगत असल्याचे लिहिले होते, स्त्री शिक्षणाच्या आवडीमुळे असेल किंवा इतर अनेकांच्या प्रमाणे ख्रिस्त धर्मातील काही चागल्या तत्वांमुळे असेल, कोल्हापूरला असतांना गोपाळरावांनी तेथील मिशनरी रे गुहीन यांच्याशी ओळख करून घेतली. त्यांच्या साहाय्याने अमेरिकेला जाऊन दोघांनी विद्याविभूषित व्हावे असे गोपाळरावांच्या मनाने घेतले. रेव्ह. गुहीन यांचा गैरसमज झाला.त्यांना वाटले की गोपाळरावांना ख्रिस्ती व्हावयाचे आहे. न्यूजर्सी राज्यातील प्रिन्स्टन शहरांत राहणाऱ्या वाईल्डर नायक गृहस्थांना रेव्ह. गुहीन यांनी जोशी दांपत्यांचे मनोगत कळविले. मनोगत कळविल्यानंतर वाईल्डर लिहितात 'आपण अर्थसाहाय्य कां अपेक्षिता हे कळत नाही. आपल्याजवळ लाख रुपये असले तरी अमेरिकेला यावयाची गरज नाही. आहात तेथेच राहा. मनोधैर्य राखून धर्मांतर करा' गोपळरावाचा आणि वाईलडर यांचा पत्रव्यवहार ज्या 'अमे'-
-रीकन ख्रिश्चन रिव्हयू'च्या अंकात छापला गेला होता. तो मिसेस कार्पेटर बाईंच्या वाचनांत आला, व त्यांनी त्यांना साहाय्य करायचे ठरविले. मिसेस कार्पेटर यांनी आनदी गोपाळांना पुढे केलेत अनेक प्रकारचे साहाय्य ध्यानांत घेता, आनंदीबाईना डॉक्टर करण्यात गोपाळरावा इतकाच त्यांचाही सहभाग होता असेच म्हणावे लागेल.

## ५ अमेरिकेस जाण्याचा बेत

गोपाळरावांनी आनंदीबाईंना अमेरिकेस पाठवायचे ठरविले होते म्हणून ते काटकसरीत राहून आणि कचेरीत सतत काम करून त्यांनी धनसंचय करण्यास सुरवात केली होती. अमेरिकेचे तिकीटाचे भाडे त्यांनी जमा केले होते. एका मागास देशातील उच्च शिक्षणासाठी आलेली पहिली महिला म्हणून तेथील शिक्षणही शिष्यवृत्यांवर होईल अशी माहितीही मिळवून ठेवली होती. आनंदीबाईंचा धीर खचू नये म्हणून एवढे दिवस लपवून ठेवलेले रहस्यही त्यांनी उघड केले. ते म्हणजे आनंदीने एका गोऱ्या बाईच्या सोबतीने एकटेच अमेरिकेला जायचे. आणि ते स्वत: पुरेसे पसे जमल्यानंतरच तिकडे येतील. आनंदीला प्रथम धक्का बसला, पण त्या निग्रही स्त्रीने आकांडतांडव न करता ते आव्हान स्वीकारले. ते एकाच निर्धाराने. डॉक्टर होण्याच्या–एक दांडगा आत्मविश्वास तिच्या पाठीशी होता. ता म्हणजे कधीही न पाहिलेल्या कार्पेंटर मावशी-कडे जणू ती शिक्षणासाठी माहेरीच जात होती

शंभर वर्षांपूर्वी एका अठरा वर्षांच्या मुलीने तब्बल ७ आठवडे प्रवासाला बोटीने एकटे, तेही अमेरिकेसारख्या अनोळखी देशात खिशात फक्त साठ–सत्तर डॉलर्स घेऊन जाणे म्हणजे एक स्तिमित करणारी घटना होती. पण ती घडली गोपाळराव जोश्यांच्या अशक्यप्राय गोष्ट शक्य करून दाखवण्याच्या स्वभावाने आणि आनंदीबाईच्या सहकार्याने.

एकटीने जाण्याचे निश्चित झाल्यावर आनंदीबाईंनी आपल्या मावशीस (मिसेस कार्पेंटर) जे पत्र लिहिले त्यांतून त्यांच्या बाणेदारपणाचे दर्शन होते. इतक्या लहान वयातही त्यांच्या बुद्धीची

झेप पाहून मन थक्क होते. पहिल्याच वाक्यात त्या जीवनाची क्षणभंगूरता जाणून इतरांवर अवलंबून राहू नये असे सांगताना त्या म्हणतात ' आयुष्य जर इतके गुलाबाच्या फुलासारखे क्षणिक आहे, तर मग एकाने दुसऱ्यावर अवलंबून का रहावे ? त्या काळातील स्त्रीची स्थिती कशी होती याचे दर्शन त्यांच्या पत्रातून घडते. स्त्रीने नेहमी घरांतच राहिले पाहिजे. बाहेर जाता कामा नये. परपुरुषाबरोबर बोलणे कुलीन स्त्रीला वर्ज्य होते. स्त्री लिहायला वाचायला शिकली तर हे सारे घडेल तिची नितीमत्ता ढासळेल, अशी कल्पना रूढ होती. अशा काळात आनंदीबाई केवळ शिकल्याच नव्हत्या, तर एकट्या परदेशी जाणार होत्या. नातलगाची देखरेख नसल्यामुळे त्यांचे पाऊल वाकडे पडेल अशी लोकांना धास्ती वाटत असल्यामुळे आनंदीबाईंच्या जाण्याला प्रखर विरोध झाला. पण लोकांच्या विरोधाने नाउमेद न होता आनंदीबाई अधिक उमेदीने परदेशी जाण्यास सिद्ध झाल्या. एवढेच नव्हे तर हाती घेतलेले कार्य पूर्ण न झाल्यास हिंदुस्थानांत परत न येण्याचा संकल्प त्यांनी सोडला, हिदु स्त्रिया कशा आहेत हे दाखवून देण्याची त्यांची जिद्द अपूर्व होती. वेदकालीन स्त्रियांचे शहाणपण, धाडस, शौर्य याचा जणू आदर्श केवळ भारतालाच नव्हे, तर साऱ्या जगाला आनंदीबाईंना घालून द्यावयाचा होता. एकूण लोकनिंदेचे मोहोळ उठले, पण मनाचा पूर्ण निर्धार केलेला असल्यामुळे आनंदीबाईंना टीका सहन करण्याचे सामर्थ्य आले.

कलकत्त्यात २४ फेब्रुवारी १८८३ रोजी आनंदीबाईंना निरोप देण्याचा समारंभ झाला. बॅप्टिस्ट कॉलेजचे रेव्ह. समर्स सभेच्या अध्यक्षस्थानी होते. आनंदीताईंच्या आयुष्यांत सभेपुढे बोलण्याचा हा पहिलाच प्रसंग. त्यांना विचारलेल्या एकंदर सहा प्रश्नांना

त्यांनी आपल्या भाषणांत उत्तरे छान दिली. ते प्रश्न असे होते— मी अमेरिकेला का जात आहे? येथच राहून विद्याभ्यास करता येणार नाही कां? मी एकटीच का जात आहे? येथे परतल्यावर मला समाजाकडून वाळीत टाकले जाणार नाही का? जर वाळीत टाकले गेलेच, तर मी काय करेन? एखाद्या पुरुषानेही जें केले नाही ते मी का करत आहे?

आनंदीबाईंची उत्तरे मासलेवाईक व त्याचा निश्चय दर्शवणारी आहेत. पहिल्या तीन प्रश्नांची उत्तरे सरळ व सोपी होती. वाळीत टाकले जाण्याची भीती आपल्याला वाटत नाही, असे त्यांनी तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर देतांना सांगितले. कारण मी येथे जशी राहिले तशीच तेथे राहीन. हिंदु म्हणून जात आहे, हिंदू म्हणूनच परत यईन आणि माझ्या समाजाला मला वाळीतच टाकायचे आहे, तर ते आताही करता येईल. कारण मी महाराष्ट्रापासून दूर बंगालात राहते आहे, असे त्या म्हणाल्या. मी परत आल्यावर काय होईल याची क्षिती आताच बाळगण्यात अर्थ नाही. कृती करणाऱ्याने निराशावादी भूमिका घेऊन चालत नाही. असा शेरा त्यांनी मारला. आपले मुद्दे स्पष्ट करताना त्यांनी मनुस्मृती व इतर संस्कृत ग्रंथाचे साह्य घेतले. हे त्यांचे व्याख्यान त्यावेळीही गाजले. ते मुंबईच्या नेटिव्ह ओपिनियन प्रेसने वेगळे छापून प्रसिद्ध केले.

## ६ अमेरिकेस प्रयाण व वास्तव्य

आनंदीबाईंचे ७ एप्रिल १८८३ ला कलकत्त्याहून जहाजाने अमेरिकेस जाण्याचे ठरले गोपाळराव अगदी अस्वस्थ झाले होते. ६ एप्रिलला पहाटे ३–३॥ लाच त्यांनी आनंदीबाईंना उठविले, आटप लवकर, उद्या जायचे आहे ना ? गोपाळराव व आनंदीबाई ने तिला पोहचवायला आले तेव्हा दोघेही एकमेकांकडे नुसते पहात होते. पण एक अक्षरही, एक शब्दही त्यांच्या तोंडून येईना. निघण्यापूर्वी गोपाळराव नुसते म्हणाले 'चला', गोपाळराव मिसेस जॉन्सनना म्हणाले, 'मी गरीब मनुष्य आहे. माझ्या बायकोला होईल तितक्या थोडचा खर्चात सुखाने जाणे होईल असे करावे.' तेव्हा जॉन्सनसाहेब म्हणाले 'माझ्या बायकोइतकाच खर्च तुम्हाला करावा लागेल ! 'सिटी ऑफ कलकत्ता' या बोटीने आनंदीबाईंनी देशाचा किनारा सोडला, तेव्हा गोपाळराव म्हणाले 'खाली पाणी, वर आकाश, प्रकृतीला जपा ईश्वरावर भरवसा ठेवून असा' हे ऐकून आनंदीबाईंच्या गालावरून अश्रु-प्रवाह सुरु झाला. डेकवर उभ्या राहून त्या गोपाळराव दृष्टीआड होईपर्यंत पाहत होत्या.

आतापर्यंत एकटी ब्राह्मणाची स्त्री परदेशी गेलेली नाही-बायको माणूस, वयाने लहान तरी आनंदीबाईनी मोठचा धैर्याने बोटीने अमेरिकेत जाण्याचे ठरविले. कलकत्त्याच्या मिसेस जॉन्सन व तिच्या मैत्रिणीच्या आधाराने हा प्रवास होणार होता मिसेस् जॉन्सन जाण्यापूर्वी आनंदीबाईंना ख्रिस्ती धर्मावर विश्वास ठेव-ण्यास सांगत होती. त्याचा काही उपयोग झाला नाही. तेव्हा तिने जहाजावर आनंदीबाईकडे पूर्ण दुर्लक्ष केले. त्रास झाला म्हणजे आनंदीबाई आपल्याकडे धाव घेईल आणि आपण तिला हवी

तेवढी मदत करून ओशाळे करू व मग ती आपले म्हणणे मान्य करेल आणि आपण तिला ख्रिस्ती धर्माची दिक्षा देऊ, असे मनातले मांडे जॉन्सन खात होती जॉन्सनच्या अपेक्षेप्रमाणे आनंदीबाईंची प्रवासात आबाळ झाली. ७ आठवडे उपासमार झाली, कारण त्यांना मिळणाऱ्या भाज्या शिळ्या, निबर देठाच्या असत, बटाटे अर्धवट शिजलेले व कुजके असत. भात तर मिळालाच नाही व जो मिळाला तो जाडा व कठीण— तो खाणेच अशक्य होते. अशातच आनंदीबाई आजारी पडल्या. दाढेचे दुखणे उपटले, हिरड्या सुजल्या, काही खाता येईना. अशास्थितीत आनंदीबाईंनी ताठ राहून मिसेस जॉन्सनचा अंदाज खोटा ठरविला, पहिला पवित्रा निरुपयोगी ठरल्यावर आनंदीबाईंशी गोडीगुलाबीने वागण्याचे मिसेस् जॉन्सनी ठरविले. पण आनंदीबाई निश्चयाच्या पक्क्या. त्यांनी जॉन्सनच्या या बेतालाही भिक घातली नाही.

आनंदीबाई म्हणतात ' ग्रंथ— हा एक मित्र या जगांत चांगल्या पुस्तकातून अधिक चांगला, सांत्वन करणारा मित्र आपणास मिळणार नाही ! ' सिटीझन् ऑफ रिवर्ल्ड ' हा ग्रंथ मी वाचला. त्यामुळे मी एकटी आहे असे मला कधीही वाटले नाही. मी बोटीवर ७ पुस्तके वाचली. बाकी ७ आठवडे उपासच ! पण त्याचे मला काही वाटले नाही.

सामिष अन्नाला हात लावायचा नाही, व आपल्या पेहरावांत बदल करावयाचा नाही, या आनंदीबाईच्या निश्चयामुळे त्यांचे अमेरिकेच्या प्रवासात आणि पुढेही अतोनात हाल झाले बोटीवर तर त्यांची स्थिती काळ्या पाण्यावर नेल्या जाणाऱ्या कैद्यासारखी झाली होती. तर गोपाळरावानी आनंदीबाईना परदेशी लिहिलेल्या पत्रांत असे नमूद केले की, तिला बोटीवर पोहचविण्यासाठी

जेव्हा ते सकाळी उठले, तेव्हा फासावर चढविण्यासाठी कैद्याला उठवितात तशी त्यांची स्थिती झाली होती अत्यंत खडतर प्रवासानंतर आनंदीबाईंनी न्यूयॉर्क येथे अमेरिकन भूमीवर दि. १८ जून १८८३ रोजी पाऊल ठेवले आणि त्याच्या स्वागतासाठी आलेल्या कार्पेंटरबाईच्या अंगावर अक्षरश: स्वत:ला झोकून दिले. 'कार्पेंटरबाई जर काही कारणानी तिथे नसत्या तर आपल्याला समुद्रात उडी देण्यावाचून गत्यंतर नव्हते' असे गोपाळरावांना रोशेल गावाहून लिहिलेल्या दि. २५ जून १८८३ च्या पत्रात त्या कळवितात. त्यांच्या गाठी त्यावेळी फक्त ७० डॉलर्स होते, अमेरिकेत पोहचल्यावर कार्पेंटर कुटुंबाच्या मदतीने त्यांनी आस-पासच्या सर्व वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या संस्थांशी स्वत: पत्रव्यवहार केला. त्यांत त्यांनी आपली आर्थिक परिस्थिती, आपण कोणत्या जिद्दीने आपण येथे आलो आणि आपल्या देशाला स्त्री डॉक्टरांची कशी निकड आहे याचे वर्णन करून शिष्यवृत्तीवर शिक्षण द्यावे म्हणून याचना केली. अखेर संपूर्ण विचारांती त्यांनी फिलाडे ल्फिया येथील विमेन्स मेडिकल कॉलेजमध्ये दि. २८ सप्टेंबर १८८३ रोजी प्रवेश मिळविला. २ ऑक्टोबर १८८३ रोजी त्यांनी गोपाळरावांना भारतात पाठविलेल्या पत्रांत आपले कॉलेज त्याच्या प्राचार्य डॉ. मिस् रेचेल बॉडले फिलाडेल्फिया-मध्ये भाड्याने घेतलेली गैरसोयीची जागा यासंबंधी कळविले. ती जागा चांगली नव्हती, अंधारी होती, विस्तव पेटत नसे. सगळीकडे धूर होई, जीव गुदमरे, डोळ्यांना त्रास होई, त्यामुळे प्रकृति बिघडली, घसा दुखू लागल.। 'डिब्येरीया' झाला. शिकण्यांत मोठाच व्यत्यय आला. मैत्रिणींनी औषधोपचार केले. बॉडलेबाईंनी पण खूप मदत केली. ८ दिवस नुसत्या दुधावर होत्या. नंतर बरे

वाटू लागले, फिलाडेल्फिया कॉलेजात आनंदीबाईनी जेव्हा प्रवेश केला तेव्हा आनंदीबाईंचे स्वागत डीनने (बॉडलेबाईनी) समारंभपूर्वक केले. त्यावेळी शंभरावर स्त्रिया व पुरुष उपस्थित होते, डीन व मावशी या दोघींच्या मध्ये मोठ्या काठाची साडी नेसून आनंदीबाई उभ्या होत्या. आनंदीबाईंचे प्रत्येक काम कुशलतेने व चित्त देऊन केलेले असे, नीटनेटकेपणा व टापटीप हे गुण पण अंगी जात्याचं होते, अमेरिकन लोकांच्या चालीरीतीचे व वागणुकीचे त्या बारीक निरीक्षण करीत. 'जॉकस्टोनस' खेळाला आपण 'सागरगोटे,' 'गजग' म्हणतो. सागरगोटे खेळण्यात पण त्या वाक्‌बगार होत्या. ते पाहून त्यांच्या मैत्रिणी थक्क झाल्या.

कार्पेटर मावशींना हास्यवदन, बारीकच पण चकाकणारे डोळे, गोंडस हातपाय, ठेंगणीठुसकी मूर्ती, सावळा रंग असलेली आनंदीबाई फार आवडे, त्या त्याच्यावर फार प्रेम करीत. त्या आनंदीबाईंचे निरनिराळ्या तऱ्हेने फोटोग्राफ घेत. अमेरिकेत आनंदीबाई निरनिराळ्या सहा भाषांतून सुस्वर गाणी म्हणून दाखवित. त्या वेदांतपर गाणी 'बुडबुडा' 'फुगडी' 'बागुलबुवा' इ. गाणी प्रामुख्याने म्हणून दाखवीत. अमेरिकेत गेल्यापासून बहुतेक काळ आनंदीबाईनी उपयुक्त ज्ञान प्राप्त करून घेण्यांतच घालविला. त्यांनी शिवणं, कशिदा, गायन– हे पण आत्मसात केले

मिस् बॉडले कॉलेजडीन, स्त्रियांचेच कॉलेज, त्यांत आनंदीबाईंना २ वर्षाच्या अभ्यासक्रमाकरिता ६०० डॉलर्स स्कॉलरशिप मिळाली. त्यांनी कॉलेजमध्ये, केमेस्ट्री, फीजॉलजी, अॅनॉटमी, Materia Mediea and Surgery, Histology हे विषय घेतले त्या कॉलेजला जातांना डोक्यावरून पदर घेत, शाल पांघरत.

एकदा मिशनरी मिटींग होती. बालविवाहावर वादविवाद होता. दोन हजार स्त्रियांसमोर आनंदीबाईनी ह्या विषयावर आपले विचार अतिशय परखडपणे मांडले, त्यावेळी त्यांना १० डॉलर्स बक्षिस मिळाले, म्हणजे तेथेही त्या कोणत्याही विषयांत माग नव्हत्या, पुन्हा एवढे असूनही अतिशय विनयशील कार्पेंटर मावशी तर त्यांना 'आनंदाचा झरा म्हणत.

गोपाळरावांचे आनंदीबाईस पत्र. त्याचा आशय पुढीलप्रमाणे :

ध्यानीमनी स्वप्नी, आसनी, शयनी तुझे (आनंदीबाईचे) कसे होईल ?

अपरिचित माणसे, भिन्न धार्मिक व सांस्कृतिक जीवन, हवामानातील होणारा त्रास ह्या सर्व प्रतिकूल परिस्थितीत देखील आपले स्वत्व न गमवता, भारतातून येणाऱ्या गोपाळरावांच्या पत्रातून मानसिक बळ प्राप्त करून घेत, आनंदीबाईचे शिक्षण सुरू झाले. भारतात एकाकी पडलेल्या गोपाळरावांना अमेरिकेतून येणारी आनंदीबाईची पत्रे हेच विश्रांतीस्थान होते. नातेवाईकांनी व समाजाने आनंदीबाई संबंधाने उठविलेल्या अफवांवर त्यांचा विश्वास नव्हता. पण आनंदीबाईकडून अभ्यासाच्या गडबडीमुळे उशिरा येणाऱ्या पत्रांमुळे त्यांना मनक्षोभ होत असे. अमेरिकेतील थंड हवामानात सोईचे जावे म्हणून आनंदीबाईनी आपल्या पोषाखात फेरफार करून गुजराथी पद्धतीची साडी नेसण्यास सुरवात केली. व आपले तशा वेषांतील एक छायाचित्र गोपाळरावांना पाठविले. त्या छायाचित्रांतील त्यांचा पदर थोडासा ढळलेला पाहून, गोपाळरावांनी रागाने अत्यंत घाणेरडे आरोप करणारे पत्र आनंदीबाईना लिहिले. एरव्ही शांत स्वभावाच्या व अत्यंत संयमी वृत्तीच्या आनंदीबाई या पत्राने प्रक्षुब्ध झाल्या.

आनदीबाईनी लिहिलेल्या उत्तरामध्ये त्यांचे न हरवलेले इतके दिवस प्रयत्नपूर्वक झाकून ठेवलेले स्वतंत्र व्यक्तिमत्व प्रकटले. आपल्या विचारांना जे योग्य वाटते तेच केल्याचा निर्धार निर्भीड-पणे लिहून साध्वीचा सात्विक संताप किती प्रखर असतो याचे दर्शन गोपाळरावांना घडविले. जणू ठिणगीवरची पारंपारिक दडपणाची राख उडाली आणि ती प्रकाशमान झाली.

याच सुमारास २९ सप्टेंबर १८९३ रोजी इग्लंडला गेलेल्या पंडित रमाबाईनी 'वाण्टेज' येथील चर्चमध्ये बाप्तिस्मा घेऊन ख्रिस्ती धर्माचा अंगीकार केल्याच्या वार्ता भारतात आल्या होत्या. एकूणच या सर्व घटनाक्रमाने, आपला मानसिक तोल गमाव-लेल्या गोपाळरावांनी 'खरं काय ते पाहावे' या हेतूने अमेरिकेस जाण्याचा निर्णय घेतला.

गोपाळरावांनी जरी अमेरिकेस जाण्याचा निर्णय घेतला असला तरी वस्तुत: तसे काहीच घडले नव्हते. आनंदीबाईचा एकूणच स्वभावधर्म अतिशय सत्वशील व धार्मिक श्रद्धा प्रत्ययास येते, त्यांनी गोपाळरावांना लिहिलेल्या पत्रांतील काही भाग असा 'हे जग सदोदित मूळ स्थितीतच असावे असा परमेश्वराचा उद्देश नाही. तसेच हे जग सत्याला बहुत दिवस अंतरावे असाही त्याना हेतू नाही. मनुष्याची बुद्धी आजपर्यंत विकास पावत आली आहे व ती पूर्णदेशप्रत पोहचेपावेतो अशीच विकसित होत जाणार. वस्तू-मात्रात बदल होत जाणे हा सृष्टीक्रमच आहे, ज्याला नवीन जीवदशा प्राप्त झाली. त्याला उत्तरोत्तर उन्नतावस्था प्राप्त होणार, जस जसा काळ लोटत जातो. त्या मानाने प्रत्येक गोष्टीत बदल होत जातो. ही गोष्ट प्रत्यक्ष आपल्या अनुभवा-वरूनच सिद्ध होते. हा बदल किंवा फेरफार आपणच केला पाहिजे असे नाही. तो सृष्टी क्रमानेच होत असतो.'

आनंदीबाईची श्रद्धा विष्णूशास्त्री चिपळूणकरांवर होती आणि 'निबंधमाला' हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतसुद्धा बरोबर नेला होता. 'केसरी' आणि 'मराठा' ही त्यांची आवडीची साप्ताहिके होती. आणि त्याचे अंक अमेरिकेत असतांना नियमितपणे मिळावेत अशीं गोपाळरावांनी व्यवस्था केली होती. त्यांच्या वाचनाने आनंदीबाईंची राष्ट्रीय वृत्ती खंबीर बनली म्हणूनच अमेरिकेतही राष्ट्रीय बाणा व स्वदेशांचे व्रत यात त्यांनी किंचितही फरक पडू दिला नाही, आनंदीबाईंनी राष्ट्राभिमान, कणखरपणा व निश्चय यांच्या जोरावर परिस्थितीला तोंड देत शिक्षण पूर्ण केले प्रतिकुल हवामानालाही आनंदीबाईना तोंड द्यावे लागत होते. अशातच अनेकदा गोपाळरावांची मन प्रक्षुब्ध करणारी पत्रे येत, अभ्यासक्रम पूर्ण करण्यास आनंदीबाई यशस्वी झाल्या. पण जेवणाची आबाळ, भोवतालचे वातावरण मनःक्षोभ करणाऱ्या गोष्टी यांचा परिणाम त्यांच्या प्रकृतीवर झाला. गोपाळरावांना वाटत होते की आनंदीबाई डॉक्टर झाल्यावर त्यांनी अमेरिकेत किंवा दुसऱ्या एखाद्या देशात स्थानिक व्हावे यामुळे पैसाही बरा मिळेल व ग्रामण्य बहिष्कार इत्यादी गोष्टी टळतील असे गोपाळरावांना वाटत होते. पण आनंदीबाई पक्क्या राष्ट्रीय वृत्तीच्या होत्या. चिपळूणकरांची निबंधमाला ही जणू त्यांची गीता बनली. म्हणूनच अमेरिकेतही राष्ट्रीय बाणा व स्वदेशीचे व्रत यांत त्यांनी किंचितही फरक पडू दिला नाही. या वृत्तीमुळेच गोपाळरावांचा तिकडेच स्थायिक होण्याचा पर्याय त्यांनी धुडकावून लावला. आपली गरज भारताला अधिक असल्याचे सांगितले. कलकत्त्याच्या लोकांनी त्यांना निरोप दिला. तेव्हा त्यांनी केलेल्या भाषणात हिंदू वैद्यक शास्त्रज्ञ स्त्रियांची

हिंदुस्थानला किती गरज आहे हे पटवून दिले. आणि ती गरज काही अंशी भागविण्यासाठी आपण अमेरिकेत जात असल्याचे सांगितले होते

त्यांचा राष्ट्राभिमान ज्वाज्वल्य होता, कारण त्यांना अमेरिकेत त्यांच्यात संपूर्ण बदल घडवून आणण्याचे प्रयत्न आजूबाजूला खूप होत होते. एपिस्कोपिअन पथाच्या धर्मोपदेशकाने एका व्याख्यानात असे नमूद केले की, आनंदीबाई जर अशाच भारतात परत गेल्या तर ते ख्रिस्ती धर्माला लाजीरवाणे ठरेल पण त्या कोणालाही हार गेल्या नाहीत, व शेवटपर्यंत आपल्या धर्मालाच धरून राहिल्या त्या अत्यंत काटकसरीने ऱ्हात काटकसरीचा 'उपाय' म्हणून त्यांनी वैद्यकीला लागणारी उपकरणेही पुरेशी घेतली नाहीत. मात्र भारतात परतण्यापूर्वी ती घेण्याची परवानगी द्यावी असे त्या गोपाळरावांना विनवितात. मधल्या काळात अर्थशास्त्राचा अभ्यास करून त्या गोपाळरावांना सुचवितात की तेथे भारतातून केल्यास चहाचा व्यापार चांगला करता येईल. याचा तपशीलवार विचार करून तो घेऊन आपण यावे.

२९५.८ ५१३८८

## ७ अमेरिकन लोकांस आनंदीबाईंनी दिलेली मेजवानी.

अमेरिकेत गेल्यावर त्यांनी अमेरिकेचा एकंदर सर्व थाट पाहिला, पण तिथे राहूनही त्यांनी भारतीय संस्कार सोडले नाहीत, आपल्या कडील भारतीय मेजवानीचा पेशवाई थाट त्यांनी कार्पेटर मावशीच्या घरी आयोजित केला होता, त्यांत त्यांच्या सर्व इष्ट मैत्रिणींचा समावेश होता कार्पेटर मावशीच्या दिवाणखान्यांत भारतीय बैठक सतरंजी घातली होती. सतरंजीवर सुंदर गाद्या ठेऊन, त्यावर स्वच्छ पलंगपोस घातले होते. त्यावर लोड व तक्के ठेवले होते, दिवाणखान्याच्या कोपऱ्यांत एका टीपॉयवर हळदकुंकू, पागसुपारी, अत्तर गुलाब व फुले ठेवली होती.

इष्टमैत्रीणींनी दिवाणखान्यांत प्रवेश केल्यावर त्यांच्याशी हस्तांदोलन न करिता आनंदीबाईनी नमस्कार केला. त्या सर्व-जणींनी पण तसाच नमस्कार करून हास्यवदन केले, त्या आल्यावर थोड्यावेळांनी त्या सर्वांना साड्या (नेसावयास) दिल्या. त्या सर्वांना साड्या (लुगडी) नेसवून दिल्या. सर्वांच्या हातात बांगड्या भरल्या. सर्वांच्या कपाळी कुंकू लावले. गजरे दिले, सर्वांना अभिवादन करून बैठकीवर नेऊन तक्या लोडाशी बसविले. सगळ्या फारच आनंदीत झाल्यानंतर जेवणाची तयारी केली, जेवावयास वडाच्या व पळसाच्या पानाच्या पत्रावळी व द्रोण बनविले होते. जेवावयास बसण्यास पाट व भारतातून गुलाल, रांगोळी, व रांगोळे मागविले होते. पानापुढे रांगोळी घातलेली पाहून त्या सर्व थक्क झाल्या ते रांगोळे त्यांना खूप आवडले. त्यांच्यातून रांगोळी व गुलाल खाली पडून सुंदर रांगोळी आपोआप घातली जाते हे पाहून त्यांना खूप आश्चर्य वाटले. जेवणाचा बेत म्हणजे खूपच मोठा होता. आनंदीबाईनी स्वतः चिरोटे, करंज्या, साखरभात,

वाटल्या डाळीचे लाडू, कचोऱ्या आदल्यादिवशीच तयार करून ठेवले होते. जेवणांत, वरण, भात, कढी, तूप, भाज्या, खिरी, बटाटा, भोपळा, रताळे, मका रोटी, शिकरण, मुरंबा, निरनिराळ्या चटण्या व वरील सर्व प्रकार पानावर वाढले, पानाच्या भोवती रांगोळी व उदबत्त्यांचा सुवास दरवळत होता, त्या सर्व जणींना नेहमी टेबलावर जेवायची सवय, पण आज सगळ्याजणी लुगडी सावरत पाटावर खाली बसल्या. हातात काटेचमचे न घेता, आज त्यांना नुसत्या हातानेच जेवावयाचे होते. हातातल्या बागड्याची कीणकीण होत होती. जेवायला बसायचे आधी आनंदीबाईनी संस्कृत श्लोक म्हटले, व त्यांनाही आपणामागून म्हणावयास लावले. जेवतांना सर्वांना आग्रह करून वाढले. सगळ्यांनाच एकंदरीत जेवण फार आवडले सर्व जेवण आटोपल्यानंतर कॉफीपान ठेवले होते ती कॉफीपण भारतीय पद्धतीप्रमाणे वेलदोडा जायफळ लावून केली होती सर्वांना खूप आवडली. जेवण झाल्यावर सर्वांना दिवाणखान्यांत भारतीय बैठकीवर नेऊन बसविले, नंतर त्यांना हळदकुंकू लावून, फुलांचे गुच्छ दिले, अत्तर, गुलाब लावले. त्यांना अत्तरदाणी व गुलाबदाणी (चांदीची) फार आवडली व गुलाबदाणीतून अंगावर गुलाबपाणी शिंपडण्याची कल्पनाही फार आवडली. हे सर्व झाल्यावर सर्वांना विडे (पानसुपारी) खाण्यास दिले ते पण सर्वांना फार आवडले. व हे सर्व आटोपून, सर्वजणी दिवाणखान्याच्या बाहेर जावयास निघाल्या तेव्हा सर्वांना पुन्हा नमस्ते (नमस्कार) केले. व आपण सर्वजणी येथे उपस्थित राहिलात याबद्दल मला फार आनंद होत आहे. मी आपली सर्वांची फार आभारी आहे. आमची भारतीय (भोजनाची) पद्धत कशी असते हे आपणा सर्वांस आज कळले असेल

एकंदरीत आनंदीबाई परदेशांत राहूनसुद्धा आपल्या भारतीय संस्कारांना विसरल्या नव्हत्या. ह्यावरुन त्यांची स्वदेशप्रीती निश्चितच दिसून येते. कार्पेंटर मावशीला तर आपल्या भाचीचे (आनंदीबाईंचे) फारच कौतुक होते. त्या तिच्यावर फार प्रेम करीत ही मेजवानी देण्याकरिता त्यांना बरीच आधिपासून तयारी करावी लागली. कारण बऱ्याचशा वस्तू त्यांना भारतातून मागवाव्या लागल्या. मिस् बॉडले व कार्पेंटर मावशी. यांच्या दोघींच्या प्रेमांत त्या अक्षरशः न्हावून निघत होत्या. एकूण आनंदीबाईनी आपल्या परदेशीय मैत्रिणींना भारतीय जेवण देऊन आपले प्रेम व्यक्त केले व आपला भारतीय भोजनाचा थाटमाट दाखवून आपले राष्ट्रीय प्रेम दर्शविले.

## ८ आनंदीबाईंची समतोल वृत्ती– एम. डी. पदवी.

अशातऱ्हेने आपल्या इष्टमैत्रिणींबरोबर राहून त्यांचे अभ्यासकर्म चालूच होते. भिन्न आचाराच्या आणि विचारांच्या मिसेस् कार्पेंटर आणि मिस् बॉडले या त्यांच्या दोन अमेरिकन मावश्यांनी त्यांना खूप मदत केली. तरी कटाक्षाने हिंदु धर्माचे आणि त्यांतील तत्वांचे पालन करण्याच्या प्रयत्नांत आनंदीबाईकडून प्रकृतीकडे दुर्लक्ष झाले. प्रकृती अस्वास्थ्याचे कारण करीत इतरांना दुःख देत बसणे हा हिंदु स्त्रीचा धर्म नाही. असा त्यांचा विश्वास असल्याने त्यानी इतरांना जास्तीत जास्त आनंद देण्याचा प्रयत्न केला. आदर्शवत आचरण ठेवले. आनंदीबाईंना 'आनंदाचा झरा' असे संबोधण्यांत येऊ लागले. फिलाडेलफिया मेघे पेनसिलव्हानिया वुमेनस् मेडिकल कॉलेजात आनंदीबाईनी तीन वर्षे मनापासून अभ्यास

केला. ४०० डॉलर्सची स्कॉलरशिपही मिळविली व ‘ डॉक्टर ऑफ मेडिसीन ’ ही पदवी पहिल्या प्रयत्नांतच मिळविली. तेव्हा त्यांचा आनंद गगनांत मावेना. वयाच्या बावीसाव्या वर्षी एक भारतीय स्त्री अमेरिकेत पहिली स्त्री वैद्यक झाली.

गोपाळराव त्यांना नियमितपणे पत्रे पाठवीत असत. त्याही त्या पत्रांना उत्तरे पाठवीत. आनंदीबाईंच्या पश्चात गोपाळरावांचा मुळचा लहरी, तापट आणि विक्षिप्त स्वभाव उफाळून वर येऊ लागला. त्यांच्या विक्षिप्तपणाचे अविष्कार आनंदीबाईंना लिहिलेल्या पत्रांतही दिसू लागले. गोपाळरावांना चिथवणाऱ्या लोकांचीही कमतरता नव्हती. पण आनंदीबाईनी ज्या धीरोदत्तपणे गोपाळरावांच्या शंकाकुशंकाचे स्पष्टीकरण केले आहे ते वाचून आनदीबाईंच्या निष्ठेची साक्ष पटते. एका पत्रांत त्यांनी म्हटले आहे की ‘ आपण माझे नेते आहात, शास्ते, समाधानकर्ते व त्राते आहात. केवळ आपल्यामुळेच मी या उन्नतदशेप्रत पोहचले आहे.’ आर्थिक विवंचनेतून सुटका करीत गोपाळराव अखेरीस स्वतःही १८८५ च्या मार्च महिन्यात पूर्वेकडून मजल दरमजल करीत चीनमार्गे सॅनफ्रान्सीस्कोला मुक्काम ठोकून फिलाडेलफियाला पोहचले होते, गोपाळरावांच्या अमेरिका भेटीने आनंदीबाईना अत्यानंद झाला तरी त्यांच्या विक्षिप्त वागण्याने अनेक परिणाम त्यांना भोगावे लागले, व ते त्यांनी मुकाटयाने भोगले, गोपाळरावांचा शंकेखोर स्वभाव त्यांना सतत त्रास देत राहीला. गोपाळरावांचा विचित्र स्वभावाचा ताप हसत सहन करीत, व स्वतःचे प्रकृती अस्वास्थ्य सांभाळून त्यांनी परीक्षा दिली. एम डी. परीक्षेसाठी त्यांनी जो प्रबंध लिहिला त्याचा विषय ‘ आर्य हिंदूचे सुतिकाशास्त्र ’ असा होता.

अमेरिकेत आल्यापासून आपल्या व्याख्यानातून हिंदू धर्माची भरपूर स्तुती आणि ख्रिश्चन धर्माची, अमेरिकन संस्कृतीची यथेच्छ नालस्ती करणारा एक भारतीय स्वामी म्हणून गोपाळराव प्रकाशात आले होते, त्यामुळे डॉ. आनंदीबाईचे पती म्हणजे भगवी कफनी घातलेली, टोपीतून शेंडी बाहेर भुरभुरत ठेवणारी एक काटकुळी व्यक्ती म्हणून गोपाळराव फिलाडेल्फियात एक आकर्षण ठरले होते. तरीही त्या दांपत्याच्या सन्मानार्थ तेथे आणि रोंचेत येथे असंख्य पार्टर्या झडत होत्या अमेरिकन समाजाच्या स्वभावानुसार, त्याहून गोपाळरावांच्या स्त्री शिक्षणाच्या प्रेमाचे कौतुक होत असे, तर त्यांनी केलेली टीका हसण्यावरी नेली जात असे, ही कसरत सांभाळतांना आनंदीबाईची खूपच कुचंबणा व्हायची. असे असूनही आनंदीबाईनी आपली समतोल वृत्ती कायम ठेवली. त्या थोड्याही विचलीत झाल्या नाहीत.

११ मार्च १८८६ रोजी आनंदीबाईंना एम. डी. पदवी देण्याचा समारंभ झाला. पदवी मिळण्याचे आधी बोस्टन शहरी आनंदीबाईंना सोन्याचे लेडीजवॉच मिळाले. या समारंभास (एम. डी.) उपस्थित राहण्यासाठी पंडिता रमाबाईना खास आमंत्रण देण्यांत आले होते. त्याही या समारंभासाठी इंग्लंडहून खास अमेरिकेला आल्या. मिस बॉडलेनी पंडिता रमाबाईना खास तिकीट पाठवून मुद्दाम बोलावून घेतले होते. पंडिता रमाबाईनी यापूवीच ख्रिस्ती धर्म स्वीकारला होता. त्यांना तर गोपाळरावांच्या वागण्याची चांगलीच झळ पोहोचली.

आनंदीबाईंचे धर्मासंबंधी विचार पण फार व्यापक होते. 'प्रीती हेच सर्वांचे बंधन आहे, हेच सर्व धर्मांचे गुढ आहे, हेच जगांतले बंधुत्व, हेच पवित्र वेदांतील तत्व,' असे त्या म्हणत

हिंदु धर्मांचा अध्यात्मिक वारसा फार मोठा आहे, हिंदुधर्माची जीवनपद्धती खऱ्या अर्थाने आचरणात आणली व समजूत घेतली तर जीवनांत, शांती समाधान व स्वास्थ लाभेल.

## ९. आनंदीबाई मायदेश परत !

अनोळखी देश, अनोळखी माणसे, अनुकूलता कसलीच नाही. तशातही तीन वर्षे कसून अभ्यास करून आनंदीबाईनी डॉक्टर ऑफ मेडिसीन ही पदवी पहिल्या प्रयत्नांतच पहिल्या वर्गात संपादन केली. वयाच्या बाविसाव्या वर्षी एक भारतीय स्त्री अमेरिकेत जाऊन पहिली भारतीय स्त्री वैद्यक झाली, माजघराबाहेरही स्त्रियांनी येऊ नये. लिहा-वाचायला शिकू नये अशी समाज-धारणा असलेला तो काळ वैद्यकीय शिक्षण मिळवून आपण आपल्या देशात परत येऊन कार्य करावे ही आनंदीबाईची इच्छा त्यांच्या अकाली निधनाने अपुरीच राहिली. पण प्रतिकुल परि-स्थितीशी टक्कर देत जिद्दीने ध्येय कसे साध्य करावे याचा आदर्श आनंदीबाईनी समाजापुढे विशेषतः स्त्रियांपुढे ठेवला.

परत निघण्यापूर्वी आपल्या सासूबाईंना लिहिलेल्या पत्रांत आनंदीबाई म्हणतात ‘आपण सर्व कोल्हापूरात एकत्र राहू मोठा बंगला मिळणार आहे. तुमच्यासाठी मी वेगळ्या आचाऱ्याची व्यवस्था करीन. दोन दिरांपैकी एकाने फार्मसिस्ट व्हावे व मला मदत करावी. दुसऱ्याने छाया चित्रकार व्हावे त्यासाठी मी एक कॅमेरा घेऊन येते. इतका दुरवरचा आराखडा करून कळविला. यात आपण त्यांच्या दृष्टीने केलेल्या विचित्र-पणाचा सर्व कुटुंबियांचा राग जावा हा हेतू दिसतो ९ ऑक्टोबर १८८६ रोजी त्यांनी न्यूयॉर्क बंदरातून भारतात परतण्यासाठी

प्रस्थान ठेवले. तेव्हा त्यांना निरोप देण्यासाठी सर्व कार्पेंटर कुटुंबीय, पंडिता रमाबाई, न्यूयॉर्क येथील श्री. साठे आदी शेकडो मडळी हजर होती. लंडन ते मुंबई या प्रवासांत त्यांना वर्णभेदामुळे खूप त्रास झाला. बोटीवरच्या गोऱ्या डॉक्टरने एका भारतीय डॉक्टरणीला धड औषधपाणीही केले नाही. त्यामुळे १६ नोव्हेंबर रोजी त्या मुंबईत बदरावर उतरल्या. तेव्हा त्यांनी पुन्हा एकदा निःश्वास सोडला. तेव्हा मुंबईकरांनी धक्यावर बरीच गर्दी केली होती. अमेरिकेला जाण्यापूर्वी अनेक कर्मठांचा विरोध त्यांना सहन करावा लागला होता. विद्येचा अखड ध्यास धरणाऱ्या आनंदीबाईंना धर्ममार्तंडाचे आणि सनातनी नातलगांचे शब्द काटयाप्रमाणे बोचले होते. पण विरोधकांपैकी कित्येकजण साता-समुद्रापलीकडे जाऊन विशेष प्राविण्य मिळवून आलेल्या विशीतील मुलीचे स्वागत करावयास उभे राहिले. हा बदल लक्षणीय होता. बदलत्या सामाजिक मतांचा तो विजय होता. मुंबईत बंदरात उतरल्यावर सुरवातीला शेठ माधवदास कापडिया याच्याकडे त्यांची व्यवस्था लावली होती. शेकडो मुबईकर त्यांना भेटण्यास वा त्यांची मुलाखत घेण्यास येत असत, एव्हांना जोशी दांपत्य जवळ जवळ निष्कांचन झाले होते, पण त्यांना आर्थिक मदत कर-ण्यांत 'मुंबईकरांनी फारसा उत्साह दाखविला नाही.' गव्हर्नरांच्या पत्नी लेडी रे आणि पुण्याहून लोकमान्य टिळक यांनी अल्पशा देणग्या पाठविल्या होत्या. लोकमान्यांनी पाठविलेले १०० रुपये आनंदीबाईनी शेवटपर्यंत आपल्या उशाखाली जपून ठेवल होते. लोकमान्य टिळकांच्या पत्राचा आशय पुढीलप्रमाणे :–

आपणास पैशाची आवश्यकता आहे, असे काल कानांवर आले. आमचा वर्तमानपत्राचा व्यवसाय आहे. प्राप्ती विशेष नाही तरी-सुद्धा आपणास १०० रु पोचवावेत अशी इच्छा आहे. आपले यश

इतके उज्वल आहे, की आपणास यापेक्षा कितीतरी मोठी रक्कम मी द्यायला हवी. परमेश्वर कृपेने आपणास लवकर बरे वाटावे व तुमच्या ज्ञानाचा व कर्तृत्वाचा आपल्या देशबांधवास उपयोग व्हावा

९ डिसेंबर १८८६ ला गोपाळरावांनी सर्व परिस्थितीचे वर्णन करणारे पत्र अमेरिकेत कार्पेटरबाईंना पाठविले, कारण एव्हाना आनंदीबाईंची प्रकृती एवढी खालावली होती की त्यांना स्वत: लिहिण्याचेही त्राण उरले नव्हते. ॲलोपथिक औषधांचा गुण येत नाही याची खात्री पटल्यावर आनंदीबाईनी पुण्याच्या मेहेंदळे वैद्यांची आयुर्वेदिक उपाययोजना घ्यावी म्हणून गोपाळरावांकडे लकडा लावला. आणि सगळयांनी पुण्याला प्रयाण केले. तेथे त्यांच्या दुर्दैवाने स्वकीयांचा कर्मठपणा आडवा आला आणि मेहेंदळे वैद्यांनी गोऱ्या लोकांमध्ये राहून आलेल्या महिलेवर उपचार करण्यास सपशेल नकार दिला. आनंदीबाई निरुपयोगी ठरत चालल्याचे आढळल्यावरून कोल्हापूरकरांनी त्यांची नेमणूक रद्द केली.

आपले ध्येय साध्य झाल्यावर डॉ. आनंदीबाईना मायदेशी परतण्याची प्रबळ इच्छा होऊ लागली. त्याचवेळी कोल्हापूरच्या महाराजांनी दिवाणाकरवी पत्र लिहून त्यांना कोल्हापूरच्या अलवर्ट एडवर्ड हॉस्पिटलच्या सुपरिंटेंडेन्टचे पद स्वीकारण्याचे आमंत्रण दिले. त्यामुळे आनंदीबाईना खूपच आनंद झाला होता पण आता त्याचा काय उपयोग !

जोशी कुटुंबाची यावेळी अत्यंत हलाखीची स्थिती झाली होती. ज्या कुटुंबाने, आपली सून एका इस्पितळाची प्रमुख शल्यवैद्य म्हणून आपल्यासह एका मोठ्या बंगल्यात राहात आहे, हजारो लोकांना औषधोपचार करून आणि शेकडो अडलल्या

स्त्रियांवर अवघड शस्त्रक्रिया करून 'नवे जीवन' दिले आहे. आणि सर्वत्र त्यांची वाहवा होत आहे अशी स्वप्ने पाहावी, त्यानांच सुविद्य आनंदीबाईना कसे वाचवावयाचे याची भ्रांत पडली त्यांत ही मंडळी अपयशी ठरली.

अमेरिकेतून अद्ययावत वैद्यकशिक्षण घेऊन आलेल्या डॉ. आनंदीबाईंच्याकडून अनेक समाजधुरिणांनी अनेक प्रकारच्या अपेक्षा केल्या होत्या. अनेक दुर्दैवी स्त्रिया त्यांच्या हातगुणाचा लाभ घेण्याची प्रतिज्ञा करीत होत्या पण ते होणे नव्हते. अतिश्रमाने आणि प्रकृतीची हेळसांड झाल्यामुळे डॉ. आनंदीबाईंची इतर सर्व गुण वैशिष्टचे निकामी ठरली. त्यांचे कर्तृत्व दुबळे झाले त्या मायदेशी परतल्या त्या स्वतःच पेशंट होऊन त्यांचे दुखणे बळावत गेले. उतार पडण्याची शक्यता कमी होऊ लागली. धर्माचा फाजील अभिमान बाळगणाऱ्या वैद्यमहाराजांनी डॉ. आनंदीबाईना दवापाणी करण्याचे नाकारले, शेवटी आनंदीबाई अगदी थकल्या होत्या तरी त्या गोपाळरावांशी अगदी मोकळेपणी बोलत होत्या, गोपाळरावांनीही त्यांचे मन आनंदीबाईजवळ मोकळे केले.

आनंदीबाई म्हणतात "मी अमेरिकेच्या वास्तव्यांत सतत तुमचाच विचार करित होते, फक्त तुमचाच! तुम्हाला कुणी कधी ओळखलच नाही, मी सुद्धा आता आताशी आयुष्याच्या टोकाशी पोचत आल्यावर ओळखायला लागले. जगाला न पटणारी गोष्ट तुम्ही करायला गेलात. तुम्हाला ती करायची होती आणि जगातही राहयच होतं, मी अमेरिकेच्या बोटीवर पाऊल ठेवल. जमिनीवर उभे असलेले तुम्ही किती एकटे, किती निराधार दिसत होता. डोळयांत अश्रू जमा झाले, तुमची आकृती अस्पष्ट झाली मनाला बजावलं, यांच्यासाठी आपल्याला डॉक्टर व्हायलाच हवं!

वाटेल ते हाल झाले, वाटेल तेवढे कष्ट पडले तरी ते सोसले पाहिजेत. निरोप घेताना तुम्हाला चुकवून तुमच्या डोळयांच्या कोपऱ्यात दोन अश्रू चोरटयासारखे उभे होते. त्यांची आठवण ठेवायची आणि एके दिवशी डॉक्टर होऊन त्यांचेच असख्य आनंदाश्रू झालेले पहायचे, पदवीदान समारंभाच्या वेळी ते आनंदाश्रू आपल्या डोळयांत पाहिले, आणि वाटलं, याक्षणी देखील मृत्यूच्या माग जायला हरकत नाही.

गोपाळराव म्हणतात " मी अगदी मूर्ख आहे. चांडाळ आहे तू तुझ्या तब्येतीबद्दल, अडचणीबद्दल कळवत राहिलीस आणि मी ! माझ्या एकटे पणाचा, मला कुठंच न मिळणाऱ्या आपुलकीचा सुड तुझ्यावर उगवत राहिलो, तुझ्या माझ्या वयांत खूप अंतर होत मी ओरडत होतो, संतापत होतो, तू एवढीशी पोर घाबरत माझं निमूटपण ऐकत होतीस तुला भिण्याची सवय लागली, मला घाबरवण्याची सवय लागली, तू अमेरिकेला नेलेस आणि माझी ती सवय मला छळू लागली. आनंदी, माझ्या सारखा कृतघ्न, नीच माणूस दुसरा कुणी नसेल दुनियेत, मी तुझी क्षमा मागतो. माझं चुकलं.

शेवटी आनंदीबाईना वेदना असह्य होऊ लागतात त्या गोपाळरावांना म्हणतात माझ्या मोठेपणाला तुम्ही कारणीभूत आणि तुमच्या छळाला मी कारणीभूत तुम्ही आता एकटे पडणार याचच दुःख मनात दाटलय, माझी अखेरची इच्छा आहे. माझी रक्षा गंगेत टाकाल, तशीच माझ्या कार्पेटर मावशीकडून तिच्या बागेत आणि फिलाडेल्फियाच्या कॉलेजातही नेऊन टाका आयुष्यांतले सगळयात सुखाचे दिवस मी तिथं काढले आहेत. शेवट २६ फेब्रुवारी १८८७ रोजी मायदेशी स्त्रियांच्या सेवाशुश्रूसे- साठी आसुसलेले एकवीस वर्षे, अकरा महिन्याचे हात निश्चेष्ट

झाले! आनंदाचा झरा अवेळी आटला, डॉ. आनंदीबाईंचे स्वप्न पुरे झाले नाही. त्यांचे शेवटचे शब्द होते यथाशक्य ते मी सारे केले बोटीच्या प्रवासात व त्यानंतरच्या आजारपणात गोपाळरावांनी आपल्या विद्याविभूषित पत्नीची जी सेवा केली त्याचे फळ त्यांना मिळाले नाही. ज्यांनी आपल्या सर्व इच्छा आकांक्षा आपल्या पत्नीवर केंद्रीत केल्या. तिला महत्प्रयासे शिकविले. तीच त्यांना सोडून गेली. देशात आणि परदेशात शंभर ठिकाणी भ्रमंती केलेल्या आनंदीबाईंची अंतीम इच्छा अशी होती की 'ज्या घरांत मी जन्मले त्याच घरात माझी प्राणज्योत मालवावी' ही इच्छा पूर्ण झाली. पुण्यातल्या त्याच घरांत २६ फेब्रुवारी १८८७ ला आनंदीबाईंनी शेवटचा श्वास घेतला महा-राष्ट्रांतील स्त्रियांना दिसलेला एक आशेचा किरण क्षणात लुप्त झाला.

डॉ. आनंदीबाईंच्या निधनानंतर गोपाळरावांचे आयुष्य शीड फाटलेल्या व सुकाणू तुटलेल्या नावेसारखे दिशाहीन झाले, काही काळानंतर त्यांनी बाप्तिस्मा घेतल्याचीही बातमी आली. उत्तरआयुष्यांत गोपाळरावांनी केलेल्या अनेक उपदव्यापाची इतिहासांत नोंद आहे. आपण घडविलेली मूर्ती भंगून तिचे तुकडे तुकडे होण्याचा दैवदुर्विलास शिल्पकाराच्या नशिबी यावा, तसे त्यांचे झाले. अन्यथा रावबहादुर माधवराव रानडे व त्यांच्या पत्नी रमाबाई, तसेच रावसाहेब गोविंदराव कानिटकर व त्यांच्या पत्नी काशीबाई या दोन सुविख्यात व सुसंस्कृत जोडयांच्या बरोबरीने गोपाळराव जोशी व त्यांच्या पत्नी डॉ. आनंदीबाई यांचाही संक्रमणकालीन समाजाने मानसन्मान केला असता. आताही लोक त्यांना आनंदी–गोपाळ या नावाने मानतातच संस्कृतीचा अभिमान बाळगणाऱ्या ध्येयवादी, ध्येयप्राप्तीसाठी प्रतिकूल परिस्थितीवर जिद्दीने मात करणाऱ्या त्यागी सेवाभावी

पतीभक्त परायण डॉ. आनंदीबाईचा भारतात आल्यावर लवकरच शेवट झाला.

आज स्त्री सर्व क्षेत्रामध्ये पुरुषाच्या बरोबरीने आणि जबरदस्त आत्मविश्वासाने वावरताना दिसते पण त्या काळांत (१०० वर्षापूर्वी) आनंदीबाईंनी मिळविलेले स्थान सहज साध्य नव्हते, त्यासाठी त्यांना प्रदीर्घ संघर्ष करावा लागला. आज स्त्री मुक्तीची चळवळ सर्वत्र फैलावत असतांना शंभर वर्षापूर्वी या स्त्री मुक्तीची अग्रणी अशी मुळांत सामान्य बुद्धीची एकबाई सातासमुद्रापलीकडे जाऊन पहिली महिला डॉक्टर होऊन आली. तेव्हां हा परकीय अमलाखाली मरगळलेला भारत देश आणि काही अंशी अमेरिका स्तंभीत झाली होती, पण त्यांचे २२ वर्षाचे जीवन आज १०० वर्षानंतरही मार्गदायी ठरले आहे.

बाल वाङ्मय विभाग
क्र. 2958 दिनांक 4/3/88

## १० डॉ. आनंदीबाई जोशी-मानसचित्र (ए मेंटल फोटोग्राफ)

मिसेस् कार्पेन्टर यांनी आनंदी-गोपाळांची पत्रे व छाया-चित्रे जपून ठेवली होती. डॉ. आनंदीबाईच्या अमेरिकेतील वास्तव्यासंबंधी टिपणेही मिसेस् कार्पेंटरांनी ठेवली होती. आनंदी-बाईंनी कार्पेंटरबाईंच्या आल्बममध्यें ३ सप्टेंबर १८८३ रोजी पुढील प्रश्नोत्तरे लिहिली आहेत.

तुम्हाला सर्वांत आवडणारा-

१) रंग- पांढरा
२) फुल- गुलाब
३) वृक्ष- आम्रवृक्ष
४) वेळ- सूर्योदय- सूर्यास्त
५) दर्शनीय वस्तू- पर्वत
६) ऋतु- वसंत
७) सुगंध- जाईचे पुष्प, मोगरा
८) रत्न- हिरा
९) सौंदर्य पैलू-सुबद्ध आकार, उत्तम आकृति, उत्तम वर्तन
१०) नांवे स्त्री-पुरुषांची- रमा, तारा, अॅनी
गोपाळ, विष्णू, कृष्ण
११) चित्रकार- सर्वच आवडतात
१२) संगीतकार- वीणा व सारंगी, व्हायोलीन
१३) शिल्पकलेचे काम- ताजमहाल.
१४) कवी- पोप, मनू आणि कालिदास.
१५) कवयित्री- मुक्ताबाई व जनाबाई
१६) गद्यग्रंथकार- गोल्डस्मिथ, मेकॉले, अॅडिसन आणि
शास्त्रीबोवा चिपळूणकर
१७) ऐतिहासिक पुरुष- सिंहहृदयी राजा रिचर्ड

१८) तासभर करमणुकीचे पुस्तक– भगवद् गीता.

१९) निर्वाणीला देखील ज्या पुस्तकाचा वियोग सहन होणार नाही असे पुस्तक कोणते? – जगाचा इतिहास (द हिस्ट्री ऑफ द वर्ल्ड)

२०) कोणत्या काळात राहणे आवडते?– वर्तमानकाळ

२१) राहाण्याचे ठिकाण कोणते पसंत आहे?–सध्या रोझेलमध्ये (येथे आनंदीबाई राहिल्या होत्या) नंतर स्वर्गात.

२२) करमणुक– वाचन

२३) व्यवसाय–सर्वसामान्यांचा हिताचा साधारण निवार्हाला जो अवश्य करावा लागेल तो,

२४) तुमचा विशेष स्वभावगुण– प्रामाणिकपणा, सत्याला अनुसरणे.

२५) नावडता दुर्गण– अप्रामाणिकपणा, व पाखंड

२६) आपल्याखेरीज दुसऱ्या कोणत्या मनुष्यासारखे व्हावेसे वाटते? –कोणासारखेही नाही.

२७) तुमची सुखाची कल्पना काय आहे? – ईश्वरनिष्ठा परमेश्वरावर विश्वास

२८) तुमची दुःखाची कल्पना काय आहे? – मनमाने वागणे आपलाच हेका चालविणे.

२९) तुम्हाला काय आवडत नाही ? – दास्य आणि परवशता

३०) तुझ्या सुखाची परमावधि कशांत?–कृतकर्माचे योग्य फळ मिळण्यात.

३१) तुमचा जगावेगळा गुणधर्म?– अजून सापडला नाही.

३२) तुमच्या पतीचा विशेष गुण कोणता?–परोपकार शीलता.

३३) अत्यंत उदात्त मनोविकार कोणता? – प्रेम

३४) अत्यंत मधुर असे शब्द कोणते? प्रेम, भूतदया, सत्य व आशा

३५) अत्यंत कर्णकटू शब्द कोणते? – नष्ट, परित्यक्त

३६) तुमच्या आयुष्याचे ध्येय कोणते? – दुसऱ्याच्या उपयोगी पडणे.

३७) तुमच्या हृद्पटलावर लिहिलेले वाक्य कोणते? – देव अवश्य मदत करील

डॉ. आनंदीबाईच्या सर्वच उत्तरांवरून त्यांचे आगळेपण निश्चितच जाणवते. तरी त्यांच्या काही प्रश्नांची उत्तरे विशेषकरून (१९, २३, २६, २७, २८, ३१, ३२ व ३६) लक्षणीय वाटतात व त्यांच्या असामान्य विचारांची साक्ष पटते.

## आनंदीबाईंचे विशेष गुण :–

निश्चय, साहस व धैर्य, अमेरिकेत अनेक संकटे आली पण निश्चयापासून ढळल्या नाहीत. मूर्तीमंत ख्रिस्ती राज्यांत ३ वर्षे राहून परधर्माचा स्वीकार न करता परदेशीयांची मने न दुःखवता आपल्या आचाराचे संरक्षण केले.

सौ. शांता परांजपे
'विनायक भुवन'
प्रभात टॉकीजवळ
७२, स्टेशन रोड, ठाणे ४००६०१

# शुद्धी पत्रक

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| प्रस्तावना | १२ | सन्मादनीय | सन्माननीय |
| ,, | १८ | त्यचे | त्यांचे |
| ,, | २१ | आथिक | आर्थिक |
| ,, | २६ | झालयावर | आल्यावर |
| हृद्गत | १४ | करण्याचा | करण्याच्या |
| ,, | २६ | अर्वाचीत | अर्वाचीन |
| ,, (पान २ रे) | ४ | वाटेले | वाटेल |
| [illegible] | १४ | Eniblem | Emblem |
|  | १५ | Competitiong | Competition |
|  | २४ | करुण | करुन |
|  | १३ | निवर्तला | निवर्तली |
|  | १५ | नोकरा | नोकरी |
| ६ | १७ | त्याचा | त्यांचा |
| ७ | ११ | नाहा | नाही |
| ७ | १४ | कधा | कधी |
| ७ | १८ | खेळण्याचा | खेळण्याची |
| ७ | १९ | आधा | आधी |
| ७ | २१ | छप्पापाणा | छप्पापाणी |
| ८ | २६ | संस्थेने | संख्येने |
| ८ | २६ | मिशनज्यांकरवीच | मिशनऱ्यांकरवीच |
| [illegible] | ५ | हार्वड | हॉवर्डच |
| ११ | १४ | सवे | सर्व |
| १२ | २३ | याना | यांना |
| १३ | ८ | समाजाशा | समाजाशी |
| १४ | १९ | सवंधीही | मवंधीही |
| १४ | २२ | दतकथा | इतक्या |
| १५ | ४ | होत | होते |
| १५ | ७ | रे | रे. |
| १५ | १२ | नायक | नामक |

BVBK-0402158

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १५ | २० | आनदी | आनंदी |
| १५ | २१ | केलेत | केलेले |
| १६ | १० | पसे | पैसे |
| १७ | २४ | ता | बा |
| १८ | ६ | त्या | त्यां |
| २० | १६ | रिवर्ल्ड | दि वर्ल्ड |
| २१ | ४ | त्याच्या | त्यांच्या |
| २१ | २३ | डिब्थेरिया | डिप्थेरीया |
| २२ | ९ | गजग | गजगे |
| २२ | २१ | २ | ३ |
| २३ | ४ | माग | मागे |
| २४ | ८ | वाण्टेज | वॉण्टेज |
| २४ | १७ | त्याना | त्याचा |
| २५ | १६ | स्थानिक | स्थायिक |
| २६ | ५ | पथ | पंथ |
| २७ | ९ | पागसुपारी | पानसूपारी |
| २८ | १ | बाटत्या | वाटल्या |
| २९ | १० | मेथे | येथे |
| २९ | १० | पेनसिलत्बानिया | पेनसिल्वानिया |
| ३१ | ९ | त्याहून | त्यातून |
| ३१ | २१ | यापूवीच | यापूर्वीच |
| ३२ | | मायदेश | मायदेशी |
| ३२ | १५ | फार्मसिम्ट | फार्मासिस्ट |
| ३३ | २२ | ठेवल | ठेवले |
| ३५ | २४ | झाला | झाली |
| ३६ | १४ | नेल्गीस | गेलीस |
| ४० | (२५) | दुर्गण | दुर्गुण |
| ४१ | | दु खवता | दुखवता |

शेवटी मल पृष्टावर
अवंतिकाबाई गोखले